CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, ८ सप्टेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २७८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



विविधता असूनदेखील हजारो वर्षांपासून देशातील लोक एकजुटीने राहतात. हे आमच्या पूर्वजांच्या कठोर साधनेचे फलित आहे. आमच्या येथे कुंभमेळा, चारधाम यात्रा, अमरनाथच्या दर्शनासाठी लोक जातात. अशा प्रकारचे अनेक देशव्यापी श्रद्धास्थानांचे पसरलेले जाळेच सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# आजपासून हिवाळी अधिवेशन

## विरोधक सरकारची कोंडी करण्यास सज्ज ● चहापानावर बहिष्कार

◆ **नागपूर, ७ डिसेंबर**

नागपुरात सोमवार, ८ डिसेंबरपासून सुरू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनात सरकारची कोंडी करण्यासाठी सज्ज आहोत, असा संदेश देण्यासाठी विरोधकांनी चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्र्यांवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून सरकारवर हल्ला चढविण्याची विरोधकांची तयारी आहे. मात्र या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी सरकारने व्यूहरचना आखली असल्याचे सूत्रांनी सांगितले.

उपराजधानीत सोमवारपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. महायुती सरकारच्या एक वर्षाच्या कार्यकाळाच्या पृष्ठभूमीवर सुरू होत असलेल्या या अधिवेशनात सरकार आपल्या कामगिरीचे गुणगान करणार असतानाच विरोधक या दाव्यांना प्रत्युत्तर देण्यास सज्ज आहे. त्यामुळे यंदाचे अधिवेशन वादळी ठरण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायती निवडणुकांमुळे लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचा अधिवेशनावर प्रभाव जाणवणार आहे. सरकारला नवीन घोषणा करता येणार नसल्याने पुरवणी मागण्या, शासकीय कामकाज आणि पूर्वनिश्चित कार्यक्रमांवरच भर राहणार आहे. अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट हे मुद्दे अधिवेशनात आक्रमकपणे मांडण्याची भूमिका विरोधकांनी घेतली आहे. अनेक शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही, तर पीकविमा रकमेचाही प्रश्न मार्गी लागलेला नाही. त्यामुळे या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरण्याची रणनीती विरोधकांनी आखली आहे. सरकार आचारसंहितेचा दाखला देत बचावात्मक भूमिकेत राहणार की काही ठोस निर्णय घेणार, याकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)




### शेतकऱ्यांसाठी कोणत्या घोषणा करणार ?

सध्या राज्यात अतिवृष्टी, पूर आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी अडचणीत आहेत. त्यामुळे या अधिवेशनात राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी कोणती मदत जाहीर करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आचारसंहिता लागू असली तरी आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित तातडीचे निर्णय सरकार घेऊ शकते. त्यामुळे पीकविमा, सवलती, आर्थिक मदत किंवा भरपाई यासंदर्भातील घोषणा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ■

### वर्षभराच्या कामकाजाची श्वेतपत्रिका जाहीर करा

शेतकरी आत्महत्या, हमीभावात अनियमितता, खते, बियाणांचा तुटवडा, मराठवाड्यातील पूरस्थिती, कुपोषण, रस्त्यांची दुरवस्था, महिलांवरील वाढते अत्याचार, अशा अनेक मुद्द्यांवर सरकार अपयशी ठरल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. सरकारने वर्षभराच्या कामकाजाची श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेसचे विधानमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ■

### पहिल्या दिवशीच पुरवणी मागण्या

८ ते १४ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी पुरवणी मागण्या सादर होणार आहेत. १० आणि ११ डिसेंबर रोजी या मागण्यांवर चर्चा होईल, तर त्याच दिवशी मतदानाची प्रक्रिया पार पडेल. १२ आणि १३ डिसेंबर रोजी शासकीय कामकाज होण्याची शक्यता असून, अखेरच्या दिवशी, १४ डिसेंबर रोजी अशासकीय कामकाजासाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. ■

# २०१४ नंतरच विदर्भ बदलतोय्

## मुख्यमंत्री फडणवीस विरोधकांवर बरसले



पत्रपरिषदेत देवेंद्र फडणवीस. बाजूला एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत दादा पाटील, अतुल सावे

◆ **नागपूर, ७ डिसेंबर**

२०१४ पूर्वीचा व त्यानंतरचा विदर्भ काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह विरोधकांनी गडचिरोली जिल्ह्यात जाऊन पाहावे. त्यानंतरच विदर्भातील फरक विरोधकांना लक्षात येईल. विदर्भातील सिंचन, रस्ते, पायाभूत सुविधांमध्ये फार मोठा बदल झाला आहे. त्यामुळे विरोधकांनी विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा करावी, आम्ही त्यांना समर्पक उत्तरे देऊ, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांवर बरसले.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी विरोधकांसाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. परंतु, विरोधकांनी बहिष्काराची परंपरा पाळली. त्यामुळे आमचा चहा आम्हालाच घ्यावा लागला, अशी कोपरखळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मारली. दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेता न नेमल्यामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकला.

त्यासंबंधीचे पत्र विजय वडेट्टीवार यांच्या लेटरहेडवर मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. त्यावर शरद पवार गटाच्या नेत्यांची स्वाक्षरी नसल्यामुळे त्याचा वेगळा अर्थ आम्ही काढणार नाही, पण शरद पवार गटाची त्या पत्रावर सही नाही, हे लक्षात आणून देत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना सुरुवातीलाच टोला लगावला.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या वक्तव्यावरून विरोधकांनी राळ उठवली आहे. राम शिंदे यांचे वक्तव्य हे मनुस्मृतीचे समर्थन करणारे आणि हुकूमशाहीने डोकं वर काढले आहे, हे दाखवणारे असल्याचे विरोधकांनी म्हटले होते. यावर विरोधकांचा आता कोणावरच विश्वास राहिला नसल्याचा टोला मुख्यमंत्र्यांनी हाणला ◂(तभा वृत्तसेवा)

### विरोधकांनी निराशा केली

विरोधकांच्या पत्रकार परिषदेने निराशा केली, असे म्हणत विरोधकांच्या मुद्द्यांतील हवा मुख्यमंत्र्यांनी काढली. विरोधी पक्षनेतेपद देण्याचा अधिकार सरकारचा नाही तर विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापतींचा आहे, याचाही त्यांनी पुनरुच्चार केला. अशा प्रकारे हे अधिवेशनही विरोधी पक्षनेत्याशिवाय होणार असल्याचे संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले. ■

## महत्त्वाचे

### अदानींची विमान वाहतूक क्षेत्रात मोठी गुंतवणूक

**नवी दिल्ली** : गौतम अदानी यांनी आता विमान वाहतूक क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. अदानी डिफेन्स सिस्टिम्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेडने प्राईम एअरो सर्व्हिसेससोबत मिळून फ्लाईट सिम्युलेशन टेक्निक सेंटरमध्ये (एफएसटीसी) ८२० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. याद्वारे कंपनीच्या बहुतांश भागावर अदानींची मालकी असेल. हा व्यवहार भारतातील विमान वाहतूक, संरक्षण आणि उच्च तंत्रज्ञान प्रशिक्षण इन्फ्रस्ट्रक्चरमध्ये अदानी समूहाची वाढती गुंतवणूक आणि महत्त्वाकांक्षा दर्शवतो. एफएसटीसी ही भारतातील सर्वात मोठी स्वतंत्र वैमानिक प्रशिक्षण संस्था आहे. कंपनीकडे ११ अत्याधुनिक फुल फ्लाईट सिम्युलेटर, १७ प्रशिक्षण विमान, डीजीसीए आणि युरोपीयन युनियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सीचे प्रमाणपत्र देखील आहे. या आंतरराष्ट्रीय मान्यतांमुळे एफसीटीसीला जागतिक स्तरावर ओळख मिळाली आहे. ■

# सप्तशृंगी गडावरून परतताना कार दरीत कोसळली; ५ जणांचा जागीच मृत्यू

**नाशिक, ७ डिसेंबर -**

नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी देवीचे दर्शन घेऊन परत जाताना रविवारी एक इनोव्हा कार संरक्षक कठडे तोडत दरीत कोसळली, या अपघातात पाच भाविकांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, सप्तशृंगी गडावरून परतत असताना, गणपती पॉइंटजवळ एक इनोव्हा कार सुमारे १२00 फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील पाच जणांना आपला जीव गमवावा लागला.

मृतकांमध्ये दोन महिला आणि तीन पुरुषांचा समावेश आहे. कारमध्ये एकूण आठ प्रवासी होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी पोहोचले आणि मदतकार्य सुरू केले आहे. मात्र, दरीची प्रचंड खोली आणि दुर्गम भाग यामुळे मदतकार्यात मोठ्या अडचणी आल्या. आठ भाविकांना बाहेर काढून नाशिक येथील रुग्णालयात पोहोचविले असता, डॉक्टरांनी पाच जणांना मृत घोषित केले, तर तिघांवर उपचार सुरू आहे. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कारने संरक्षक कठडा तोडला आणि थेट खोल दरीत कोसळल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली.

### सीमा शुल्क प्रणालीत लवकरत बदल

**नवी दिल्ली** : सीमा शुल्क प्रणालीमध्ये अर्थसंकल्पापूर्वी अनेक मोठे बदल केले जातील. ही सरकारची पुढील सर्वात मोठी सुधारणा असेल. याचा उद्देश नियम सोपे करणे आहे, जेणेकरून व्यवसाय आणि व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही, अशी माहिती एका कार्यक्रमात अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी दिली. सीमा शुल्क प्रणालीतील सुधारणा अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे आणि यामुळे पारदर्शकता वाढेल आणि अनुपालन सोपे होईल. ■

### जीडीपीमध्ये विमा प्रीमियमचा वाटा केवळ ३.७ टक्के



**नवी दिल्ली** : देशातील विमा क्षेत्र गेल्या दोन वर्षांत देशांतर्गत बाजारात १७ टक्के दराने वाढत आहे. परंतु आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये देशाच्या आर्थिक विकास दरामध्ये प्रीमियमचा वाटा केवळ ३.७ टक्के आहे. यावरून हे स्पष्ट होते की देशातील एक मोठा वर्ग विमा सेवांपासून वंचित आहे. याहून महत्त्वाची बाब म्हणजे, विमा उत्पादनांबद्दल मोठ्या लोकसंख्येमध्ये पुरेशी समज नाही. हा वर्ग विम्याला आर्थिक संकटातून वाचवणारे सुरक्षा कवच न मानता, कर बचत साधन किंवा गुंतवणुकीचे उत्पादन मानतो. ■

### जबाबदारी निश्चित केली जाणार : मुरलीधर मोहोळ

**पुणे, ७ डिसेंबर**

इंडिगो संकटामुळे प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागला आहे आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी पावले उचलली जात आहेत, असे केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी सांगितले.

इंडिगोने २000 हून अधिक उड्डाणे रद्द केली आहेत आणि इतरांना उशीर झाला आहे, त्यामुळे मंगळवारपासून देशभरातील अनेक विमानतळांवर हजारो प्रवासी अडकले आहेत व त्यांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. विमान वाहतूक नियामक, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) सध्याच्या परिस्थितीची कारणे निश्चित करण्यासाठी आणि उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी चार सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे आणि इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

# नाईट क्लबला आग; २५ जणांचा मृत्यू

## गोव्यातील घटना, क्लबच्या मालकास अटक



◆ **पणजी, ७ डिसेंबर**

गोव्यातील अर्पोरा येथील नाइटक्लबमध्ये नृत्याचे सादरीकरण सुरू असताना शनिवारी मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर सहा जण जखमी आहे. घटनेची दखल घेत मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले, तसेच पोलिसांनी गुन्हा दाखल करून क्लबचा मालक सौरभ लुथरा आणि व्यवस्थापक विवेक सिंग यांना अटक केली. मृतकांच्या कुटुंबीयांना दोन लाख, तर जखमींना ५० हजारांची मदत सरकारकडून घोषित केली.

गोव्याचे पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, क्लबच्या तळमजल्यावरील स्वयंपाकघरातील सिलेंडर लिकेज झाला, आणि त्याचा अचानक स्फोट झाल्याने आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले. आगीच्यावेळी क्लबमध्ये शंभरपेक्षा अधिक नागरिक होते. आग नियंत्रणात आणून आत अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यात आले. होरपळलेल्या नागरिकांना तातडीने रुग्णालयात पोहोचविण्यात आले, तिथे डॉक्टरांनी २५ जणांना मृत घोषित केले, तर सहा नागरिकांवर उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये ४ पर्यटक आणि १४ क्लबमधील कर्मचारी आहेत, तर ७ जणांची ओळख अद्याप पटलेली नाही. याप्रकरणी क्लबचा मालक आणि व्यवस्थापकाला अटक करण्यात आली.

सुरक्षेसंदर्भातील त्रुटींवर बोलताना त्यांनी सांगितले की, अग्निशमन पथक आणि पोलिसांकडून तपास सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यावरच यावर अधिक माहिती दिली जाईल. जे लोक या दुर्घटनेसाठी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींनी मृतांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला. या घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाखांची मदत आणि जखमी झालेल्यांना ५० हजारांची मदत पंतप्रधानांनी जाहीर केली. ◂(वृत्तसंस्था)

### बेकायदेशीर बांधकामाकडे दुर्लक्ष

अर्पोरा नागोवाचे सरपंच रोशन रेडकर यांनी सांगितले की, नाईट क्लबचे बांधकाम बेकायदेशीर होते आणि त्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती. आम्ही चौकशी केली तेव्हा आम्हाला आढळले की नाईट क्लबच्या बांधकामासाठी कोणताही परवाना घेण्यात आला नव्हता. त्यानंतर, आम्ही नाईट क्लब पाडण्याचे आदेश दिले, परंतु आदेशाला सरकारने स्थगिती दिली. ■

# स्मृती मंधानाने लग्न मोडले

◆ **नवी दिल्ली, ७ डिसेंबर**



भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज व उपकर्णधार स्मृती मंधानाने अखेर तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सुरू असलेल्या अटकळींवर मौन सोडले आहे. स्मृतीने संगीतकार व गायक पलाश मुच्छलसोबतचे लग्न रद्द केले आहे व आपल्या समाज माध्यम हॅण्डलवर या प्रकरणावर अधिकृत निवेदन जारी केले आहे.

मी हे प्रकरण येथेच संपवू इच्छिते आणि दोन्ही कुटुंबांच्या गोपनीयतेचा आदर करा आणि आम्हाला पुढे जाण्यासाठी मोकळीक द्यावी. माझे नेहमीच लक्ष भारतासाठी खेळणे व ट्रॉफी जिंकणे यावर असेल, असे तिने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# गोंधळ कायम, ६५० उड्डाणे रद्द

## संसदीय समितीची कंपनी संचालकांना नोटीस, ६१० कोटींचा परतावा

◆ **नवी दिल्ली, ७ डिसेंबर**

केंद्र सरकारने दखल घेत इंडिगो विमान कंपनीला उड्डाणे सुरळीत करण्याचे सक्तीचे निर्देश दिले असताना रविवारी सलग पाचव्या दिवशी देशभरातील प्रमुख विमानतळांवर ६५० विमानांची उड्डाणे रद्द करण्याची नामुष्की कंपनीवर आली. अशातच याप्रकरणी संसदीय समितीने कंपनीच्या संचालकांना नोटीस बजावून दोन दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.




रविवारी १६५० विमानांनी निर्धारित वेळेत उड्डाण केले आणि सरकारच्या सूचनेनुसार प्रवाशांच्या तिकीट भाड्याचे ६१० कोटी रुपये, तसेच ३ हजार बॅग परत केल्याचे कंपनीने म्हटले आहे. जेडीयूचे खासदार संजय झा यांच्या अध्यक्षतेतील संसदीय स्थायी समितीने इंडिगोचे संचालक आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात् डीजीसीएच्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावली. विमानांच्या उड्डाणांमध्ये येणारा व्यत्यय आणि त्यावर काढण्यात आलेल्या तोडग्याची माहिती दोन दिवसांत सादर करण्याच्या सूचना नोटीसमधून देण्यात आल्या. यापूर्वी डीजीसीएने इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स आणि सीओओ पोर्केरास यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती आणि उड्डाणे रद्द होण्याच्या कारणांची माहिती सादर करण्याचे आदेश दिले होते. नागरी उड्डाणमंत्री के. राममोहन नायडू यांनी मंत्रालयातील अधिकाऱ्यांसह पीटर एल्बर्स यांच्यासोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीत इंडिगोच्या सीईओंना विमानांची उड्डाणे सुरळीत करणे आणि नवीन एफडीटीएल नियमांचे पालन करण्याचे निर्देश दिले. ◂(वृत्तसंस्था)

### कंपनीने दिली परिस्थितीची माहिती

इंडिगो कंपनीने रविवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, केंद्रीय उड्डाण मंत्रालय आणि डीजीसीएने दिलेल्या निर्देशानुसार रविवारी ६१० कोटींचा परतावा प्रवाशांच्या खात्यात जमा करण्यात आला. याशिवाय तीन बॅगादेखील परत केल्या आहे. परिस्थितीत सुधारणा होत असून, आज १६५० विमानांची उड्डाणे निर्धारित वेळेत झाली. संचालक मंडळ प्रवाशांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. ■

# पाच लाखांवर लोकांनी केले गीता पठन

## कोलकात्याच्या ब्रिगेड मैदानावर नवा विक्रम प्रस्थापित

◆ **कोलकाता, ७ डिसेंबर**

कोलकात्याच्या ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राउंडवर रविवारी दुपारी देशभरातील सुमारे पाच लाखांवर लोकांनी एकत्रितपणे गीतेचे पठन केले. सनातन धर्माचे सार आणि गीतेचे वैश्विक संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने सनातन संस्कृती संसद नावाच्या संस्थेने हे सामूहिक गीता पठण आयोजित केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडलेश्वर स्वामी ज्ञानानंद महाराज होते. पद्मभूषण साध्वी ऋतंबरा आणि बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे देखील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बंगालचे राज्यपाल डॉ. सी.व्ही. आनंद बोस, केंद्रीय मंत्री सुकांत मजुमदार, बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्यासह अनेक भाजपा खासदार, आमदार आणि नेते सामूहिक गीता पठणात सहभागी झाले होते.

महामंडलेश्वर स्वामी ज्ञानानंद महाराजांनी व्यासपीठावरून दावा केला की पाच लाखांहून अधिक लोकांनी, ज्यात मोठ्या संख्येने संत आणि ऋषींचा समावेश होता, सामूहिक गीता पठनात भाग घेतला. गीतेचे अध्याय १, ९ आणि १८ पठण करण्यात आले. गीता पठणासाठी संपूर्ण ब्रिगेड मैदान भगव्या ध्वजांनी सजवण्यात आले होते. ◂(वृत्तसंस्था)





### २०२२ मध्ये गीता पठनाची सुरुवात

ज्ञानानंद महाराज म्हणाले की, बंगालमध्ये गीता पठनाचा कार्यक्रम आज पहिल्यांदा झालेला नाही. हा कार्यक्रम २०२२ मध्ये पहिल्यांदा पाच हजार लोकांसह सुरू झाला होता. तो आता पाच लाखांपर्यंत वाढला आहे. त्यांनी हिंदूंना जागृत होण्याचे आवाहन केले आणि हिंदू राष्ट्राचा जयजयकार केला. ■

### बागेश्वर बाबांची मंचावरून गर्जना

कोलकाता येथे गीता पठण कार्यक्रमादरम्यान, बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी व्यासपीठावरून सांगितले की जर हिंदू एकत्र आले तर भारताला हिंदू राष्ट्र होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. हा देश बाबरचा नाही तर रघुवरचा आहे. हिंदूंनी एकत्र येऊन प्रत्येक गावात भगवा ध्वज फडकावावा. आम्ही लवकरच कथा करण्यासाठी बंगालमध्ये येऊ.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी सरासरी ९६.९८ टक्के मतदान

## आज होणार मतमोजणी; जिल्ह्याचे लागले लक्ष

### ३६ उमेदवार मैदानात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ डिसेंबर-**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी रविवारी बार्शीत शांततेत मतदान झाले. ३६ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. मतदान संपल्यानंतर ९६.९८ टक्के मतदान झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांनी सांगितले



आज सोमवारी सकाळी ८ वाजल्यापासून आदित्य कृष्णा मंगल कार्यालय येथे मतमोजणी होणार आहे. सुलाखे हायस्कूलसह नवीन मराठी शाळा आणि वैराग येथेही मतदान केंद्रात सहकारी संस्था, ग्रामपंचायत, आणि हमाल तोलार मतदार संघासाठी चुरशीने मतदान झाले. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

सहकारी संस्था मतदार संघात १ हजार ६३३, मतदारांनी (९९. २७ टक्के), ग्रामपंचायत मतदार संघात १ हजार २७ (९८. ८५ टक्के) तर हमाल तोलार मतदार संघात ९३७ मतदारांनी (९१. ४१ टक्के) हक्क बजावला. एकूण ३ हजार ७०९ मतदारांपैकी ३ हजार ५९७ (९६. ९८ टक्के) मतदान झाल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनिस सय्यद यांनी सांगितले. मतदान केंद्राबाहेर दोन्हीही गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती आणि घोषणाबाजी ही केली.

## सार्वजनिक शौचालयाचे नुकसान; पाच जणांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

शहरातील अंबिका नगर येथे सार्वजनिक शौचालयाची जागा बळकवण्याच्या उद्देशाने शौचालयाची सीट व त्याचे भिंत दरवाजाचे नुकसान केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ३ डिसेंबर रोजी सायंकाळी चार ते रात्री सात वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सोलापूर महानगरपालिकेकडील घनकचरा विभागाचे कर्मचारी विश्वास लमुवेल क्षीरसागर (वय ४५, रा. सोलापूर, व्यवसाय नोकरी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून नागेश शिवलिंगप्पा कोरे (रा. कुमठा नाका), काशिनाथ कुंभार तीन साथीदार व जेसीबी चालक आणि जेसीबी मालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अंबिका नगर येथील सोलापूर महानगरपालिकेच्या ताबे कब्जे वहीवाटेतील जागेवर असलेले महिलांसाठी पाच व पुरुषांसाठी पाच सार्वजनिक शौचालयाची जागा बळकावण्याच्या उद्देशाने यातील संशयित आरोपी नागेश कोरे आणि काशिनाथ कुंभार यांनी त्यांच्या इतर साथीदार यांनी जेसीबी मशीनच्या साह्याने शौचालयाचे सीट व त्याची भिंत व दरवाजाचे नुकसान करून ते पूर्णतः पाडले. तसेच शौचालयासमोर बसवलेली शहाबादी फरशी तसेच बाहेर निघणारे मल व पाणी वाहून जाणारी सेफ्टी टँक पर्यंत जाणारी पाईपलाईन फोडून जवळपास सात लाख रुपयांचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## रिपाइंच्या वतीने डॉ.आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अस्थिचे दर्शन घेण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पवन थोरात,शाम धुरी,सुशील सरवदे,दत्ता कांबळे,सुग्रीव जेठीथोर,विकास सरवदे,मल्लू शिवशरण,संजय गायकवाड,राम सलवदे,प्रभाकर शहापूरे,दावला सुर्वे,महादेव बाबरे, शिवम सोनकांबळे,समीर नदाफ,किशोर इंगळे, राहुल वाळके, उपगुप्त चौधरी,सचिन कांबळे,उमेश उबाळे, सचिन शिंदे, राहुल गाडे,



शीतल कांबळे,सचिन गायकवाड, सचिन बनसोडे,प्रशांत गायकवाड,अक्षय चंदशिवे,संतोष गायकवाड, हनमंतू वाघमारे, बापू शिवशरण, किरण बनसोडे, स्वप्नील कांबळे,नागेश भंडारे उपस्थित होते.

## हिंदी परीक्षेत श्राविका प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था सदाशिव पेठ पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या अखिल भारतीय राजभाषा हिंदी ऑलिंपियाड परीक्षेमध्ये उमाबाई श्राविका विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

प्रशालेतील १२० विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट झाले होते. विशेष बाब म्हणजे त्यात सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले असून त्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सहभागासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापकांना महात्मा गांधी आदर्श प्रधानाचार्य पुरस्काराने



तसेच सर्व हिंदी शिक्षकांना उत्कृष्ट सहभागासाठी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे,वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रशालेतील हिंदी विषयाचे शिक्षक माधवी खोत, अनंत बळळे, अनुप कस्तुरे वृषभ सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.

## झरेगावच्या श्री सद्गुरू मठात दत्त जयंती उत्साहात

### १५ हजार भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

दत्त भक्तांचे जागृत देवस्थान म्हणून भाविकांची ओळख असलेल्या बार्शी तालुक्यातील बार्शी-तुळजापूर रोडवरील झरेगाव येथील एकमुखी श्री सद्गुरू दत्त मठावर श्री दत्त जन्मोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी १५ हजार भाविकांनी हजेरी लावत दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा! च्या जयघोषात मोठ्या उत्साहात गुरूपौर्णिमा उत्सव साजरा केला.

यावेळी श्री दत्त महाराजांची पूजा, आरती, गुरुचरित्र पारायण, पाळणा गायन या सारखे धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. गुरुवर्य विष्णू (बाबा) कबीर महाराज पंढरपूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत येथे हा उत्सव पार पडला. यावेळी विष्णू महाराजांचे प्रवचन झाले. तसेच गुरुवर्य काका महाराज झरेगावकर यांचेही प्रवचन झाले. गुरुवर्य काका महाराजांनी आपल्या प्रवचनातून पतीव्रता अनुसया यांचे पावित्र्य याची परीक्षा घेताना त्रिदेवांनी केलेली मागणी त्यावर अनुसयाने आपल्या पावित्र्य आणि आदित्यचा धर्म पाळून देवतांनाच बालक बनवले. ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिन्ही देवांना अंश म्हणून अनुसया पोटी श्री दत्त जन्मले या कथेचे विवरण करून दत्त जन्माची महती उपस्थित भक्तजनांना आपल्या प्रवचनातून



करून दिले. पहाटे काकड आरती, दासबोध भजन, दुपारी बारानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. दत्त जन्मोत्सवावेळी महिलांसह दत्त भक्तांनी मंदिरात अलोट गर्दी केली होती. मंदिरात फलांची आरास करत फुलांचा पाळणा बनवून दत्त जन्माचे प्रवचन आणि पाळणे गाऊन जन्मोत्सव साजरा केला. श्रींची पालखी मिरवणूक रात्री ९:३० वाजता मंदिरात आल्यानंतर देवस्थानच्या वतीने शिरा प्रसाद वाटप होवून श्री दत्त जयंती उत्सवाचा सांगता झाली.

## शिक्षक भरतीसाठी आज जनआक्रोश मोर्चा

**तभा वृासेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

राज्यात शिक्षक भरती दीर्घकाळ प्रलंबित असल्याने हजारो पात्र तरुणांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनदरबारी वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने भावी शिक्षकांतर्फे हिवाळी अधिवेशनात ८ डिसेंबरला 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात येणार आहे. अधिवेशन संपेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची तयारी संघटनांकडून सुरू आहे. या आंदोलनात सोलापूरचे भावी शिक्षकही सहभागी होणार असल्याचे पवित्र पोर्टल संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगूर यांनी सांगितले.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून अनेक पात्र उमेदवारांना रोजगाराची संधी मिळाली असली तरी काही अनियमितता, अपारदर्शकता आणि प्रक्रिया विलंबामुळे मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण झाल्याची भावना उमेदवारांकडून व्यक्त केली जात आहे. समूह शाळा योजना तात्काळ कायमची बंद करा. कंत्राट शिक्षकभरती रद्द करून नवीन शैक्षणिक धोरणानुसार १००% शिक्षकभरती करा. पवित्र पोर्टलवर नोंदणी सुरू करून एक बिंदू एक पदभरती करत प्रतीक्षा यादी लावा व एकाच टप्प्यात भरती करा. आश्रम शाळा, समाजकल्याण शाळा, अल्पसंख्यांक शाळेवर पवित्रपोर्टलवरून भरती करा. नपा, मनपा, कटक मंडळ आस्थापनाच्या सर्व रिक्त जागा भरा.शिक्षणसेवकांना कोणतेही सेवा संरक्षण, अनुकंपा विमा नसल्याने त्यांचे मानधन १६ हजार वरून ४० हजार करावे. कला, क्रीडा, संगीत, कार्यानुभव विषय शिक्षकांच्या जागा पूर्ण क्षमतेने भरण्यात यावेत. या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येणार असल्याचे शिरगूर यांनी सांगितले.

## दिव्यांग दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती शिबीर

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व एन.ए.बी. संचलित निवासी अंध कार्यशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. देवयानी किणगी यांनी दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ अंतर्गत शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, आरक्षण व सन्मानाने जगण्याचा दिव्यांगांना असलेला कायदेशीर हक्क स्पष्ट करून सांगितला. शासकीय कार्यालये, शाळा, रुग्णालये व सार्वजनिक ठिकाणी सुगमतेच्या सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. दिव्यांगांवर होणारा भेदभाव, छळ वा हक्कांपासून वंचित ठेवण्याचे प्रकार हे शिक्षापात्र गुन्हे असल्याची माहितीही देण्यात आली. शिवकैलास झुरळे यांनी दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, प्रवास सवलती, शैक्षणिक व रोजगारावरील विशेष सवलती याबाबत माहिती दिली. प्रश्नोत्तर सत्रात कायदेविषयक तज्ञ देवयानी किणगी, शिवकैलास झूरळे व अनुराधा कदम यांनी संबंधित प्रश्नांना योग्य कायदेशीर उपाय सुचवले. व्यासपीठावर अंकुश कदम, रामचंद्र कुलकर्णी, देवयानी किणगी, अनुराधा कदम, शिवकैलास झूरळे व स्वप्नील मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबीर यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.



## आ.विजय देशमुख यांनी साधला प्रभाग ४ मधील जनतेशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

सोलापूर शहर उत्तर मंगळवार पेठेतील श्री. र. ह. अट्टल माहेश्वरी भवन येथे भाजपा प्रभाग ०४ वतीने आयोजित केलेल्या जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत आमदार विजय देशमुख यांनी जनतेशी थेट संवाद साधत अडचणी ऐकूण व समजून घेऊन त्यावर त्वरित तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

माजी नगरसेवक अनंत जाधव यांच्या पुढाकारातून या जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विनायक विटकर, वंदना गायकवाड, सुरेखा काकडे, महेश तापडिया, देविदास चेळेकर, राजाभाऊ काकडे, अजित गायकवाड, गणेश साखरे, गौतम कसबे, सचिन कुलकर्णी, मनोज मलकुनाईक, श्रीकांत कट्टीमनी, गोपाळ झंवर, बाळू दरक, शिवराज पवार उपस्थित होते.

आमच्या प्रभागात विविध बाजारपेठा असून वाहनांच्या वर्दळीमुळे वाहतुकीची कोंडी होत असते. त्यासाठी स्वतंत्र वाहनतळ उपलब्ध करुन द्यावे. आमदार विजयकुमार देशमुख यांनी आमच्याशी थेट संवाद साधत अडचणी जाणून घेतले. त्यांच्या निरंतर कार्याच्या माध्यमातून आमच्या भागाचा सर्वांगीण विकास झालेला आहे. याविषयी समाधान वाटते, असे या बैठकीत सहभागी नागरिकांनी सांगितले.

## महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने मोफत अर्ज द्यावे : रसाळे

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

सोलापूरमध्ये माजी केद्रीयमंत्री सुशिलकुमार शिंदे सत्तेवर असताना अनेकजण काँग्रेस पक्षासोबत होते. परंतु काँग्रसची सत्ता जाताच हे नेते सुशीलकुमार शिंदे यांची आणि पक्षाची साथ सोडून पक्षांतर केले . आज सामान्य कार्यकर्ता पक्षाबरोबर एकनिष्ठ आहे. पक्षाकडे सत्ता असताना आणि नसताना देखील त्यांची काही अपेक्षा दिसून येत नाही. देश, राज्य आणि शहरांमध्ये काँग्रेस पक्षच सत्तेवर असला पाहिजे हेच विचार घेऊन सामान्य कार्यकर्ता काम करताना दिसून येतो. महापालिकेची निवडणूक म्हणजे कार्यकर्त्याची निवडणूक आहे. पक्षाकडून उमेदवारी मिळेल याच आशेवर सामान्य कार्यकर्ता सतत पक्षाचे काम करीत असतो. २० ते २५ वर्ष पक्षाचे एकनिष्ठेने काम करत असलेले कार्यकर्ते आजही दिसून येतात. पक्षाचे प्रचार पत्रक वाटण्यापासून ते बूथ कमिटी पर्यंत कुठल्याही आशेवर न राहता तो सतत नेत्याने सांगितलेले काम करीत असता. त्याची एकच आशा असते पाच वर्षांमध्ये होणाऱ्या निवडणुकीमध्ये कुठेतरी सेवेची संधी मिळेल काँग्रेस पक्षाचे असे अनेक कार्यकर्ते आहेत जे आपल्या प्रपंचाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी लहान सहान कामे करीत असतात . कार्यकर्ता गरीब असल्याने महापालिकेच्या निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांकडून विनामूल्य फॉर्म भरून घ्यावाअशी मागणी काँग्रेसचे सुनील रसाळे यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

## महत्वाचे...



### शिवसेना ठाकरे पक्षातर्फे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उत्तर सोलापूर तालुका यांच्या वतीने आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहन्यात आली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संबंध जगाने आदर्श घ्यावा असे संविधान आपल्या देशाला दिले आहे याचे सर्वांगानी रक्षण करणे हे सर्व भारतीयांचे कर्तव्य आहे आणी हे कर्तव्य सर्वांनी प्रामाणीक पणे पार पाडले पाहीजे, असे प्रतीपादन शिवसेना तालुका प्रमुख संजय पौळ यांनी केले. याप्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख संजय पौळ, महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका प्रमुख गणेश भोसले, गावडी दारफळचे माजी सरपंच बाबासाहेब लोंढे, शिवसेना उपविभाग प्रमुख अरुण लोंढे उपस्थित होते



### अवैध मुरूम उपसा प्रकरणी वनविभागाची कारवाई

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

माळढोक पक्षी अभयारण्यातील मौजे कोंडी येथील गट क्रमांक १६६ मध्ये अवैधरीत्या सुरू असलेल्या मुरूम उपसा प्रकरणी वनविभागाने धडक कारवाई करत एक जेसीबी (एमएच१३ सीएस ०५९५) व एक टिपर (एमएच २५जे ०९२५) जप्त करून संबंधितांवर वन गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजता करण्यात आली. याप्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत खालील व्यक्तींवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दिलीप सौदागर ननवरे, रा. बीबी दारफळ टिपर मालक, यशवंत प्रवीण डोंगरे, रा. बाळे जेसीबी मालक, प्रेम धर्मा राठोड, रा. अकोले काटी टिपर चालक, यासिन मलिक तांबोळी, रा. बाळे जेसीबी चालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी वनपरिमंडळ अधिकारी नान्नज-२ महावीर शेळके, वनरक्षक मारोती मुंडकर, सुधीर गवळी, बाबा साठे, सारंग म्हमाणे, सोमनाथ धारेराव तसेच वाहनचालक मारुती गवळी यांनी समन्वय साधत परिसराला वेढा घालून अवैधरीत्या मुरूम भरलेले टिपर व कार्यरत जेसीबी जप्त केले. वनविभागाच्या या धडाकेबाज कारवाईमुळे माळढोक अभयारण्यात वाढत्या अवैध मुरूम उपसा प्रकारांवर मोठा आळा बसण्यास मदत होणार आहे. या कारवाईत वनपरिमंडळ अधिकारी नान्नज-१ गुरुदत्त दाभाडे, वनरक्षक कौशल्या बडूरे, सत्वशिला कांबळे, तसेच सुनील थोरात यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. ही कारवाई उपवनसंरक्षक विवेक होशिंग, विभागीय वनाधिकारी संदीप गवारे, तसेच सहाय्यक वनसंरक्षक जयश्री पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप कोरे यांच्या गस्ती पथकाने केली.



### जुन्या भाषेतील हस्तलिखितांमध्ये मोठी ज्ञानसंपदा: डॉ.निलेश जोशी

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

जुन्या भाषेतील हस्तलिखितांवर संशोधन करून विद्यार्थी व अभ्यासकांनी पारंपारिक ज्ञान, साहित्य समोर आणावे. त्यामध्ये मोठी ज्ञानसंपदा असून त्याचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी करावा, असे आवाहन आयआयटी, मुंबई येथील वरिष्ठ भाषाशास्त्रज्ञ डॉ. निलेश जोशी यांनी केले. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भाषा व वांग्मय संगोलातील संस्कृत विभाग आणि श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे यांच्यावतीने आयोजित श्री समर्थ डॉ. निलेश जोशी, स्वामी लिखित वाल्मकीय रामायणाचे समीक्षात्मक अध्ययन' कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. जोशी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, भाषा संकुलाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड, अधिसभा सदस्य चन्नवीर बंकुर, प्रसाद भंडारी आदींची उपस्थिती होती. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर म्हणाले की, संस्कृत, प्राकृत, मोडी लिपी या भाषांमध्ये भरपूर साहित्य व ज्ञान लपले आहे. त्यामुळे त्याचा संशोधन व अभ्यास करून जुने ज्ञान व साहित्य समोर आणण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, चन्नवीर बंकुर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. अंजना लावंड यांनी केले. मान्यवरांचा परिचय प्रा. ममता बोल्ली यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभार डॉ. गुरुबसप्पा करपे यांनी मानले.

# थेट चीनच्या सीमेपर्यंत भारताची धडक

## श्योक बोगद्याचे संरक्षण मंत्र्यांचे हस्ते उद्घाटन, पाच हजार कोटींचे प्रकल्प देशाला समर्पित




◆ **लेह, ७ डिसेंबर**

लडाखमध्ये सीमा रस्ते संघटना अर्थात् बीआरओने बांधलेल्या १२५ पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते रविवारी पार पडले. यात दारबुक श्योक दौलत बेग ओल्डी मार्गावर बांधलेल्या ९२० मीटर लांबीच्या श्योक बोगद्याचा समावेश आहे. या बोगद्यामुळे थेट चीनच्या सीमेपर्यंत लष्कराची वाहने नेता येणार असून, लष्करी मोहिमेदरम्यान अतिशय कमी वेळेत सीमेवकर रसद पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे.

राजनाथ सिंह यांच्या हस्ते गलवान स्मारकासह पाच हजार कोटींच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आहे. सीमावर्ती पायाभूत सुविधांना बळकट करण्याच्या योजनांचा भाग म्हणून या प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली. उद्घाटनानंतर संबोधित करताना, संरक्षण मंत्री सिंह म्हणाले की, हे प्रकल्प लष्कराच्या शूर सैनिकांना आणि बीआरओच्या त्या जवानांना श्रद्धांजली आहेत जे देशासाठी न थकता काम करतात. त्यांनी पुढे सांगितले की, यापूर्वी इतक्या मोठ्या संख्येने प्रकल्पांचे उद्घाटन कधीही झाले नव्हते. आज मला देशाला १२५ बीआरओ प्रकल्प आणि एक युद्ध स्मारक समर्पित करताना आनंद होत आहे. सैनिकांचे शौर्य आपल्यासाठी प्रेरणा आहे. सैन्यातील आपले शूर सैनिक आणि तुमच्यासारखे बीआरओचे सर्व कर्मचारी देशासाठी अविरतपणे काम करत आहेत, त्यामुळेच देश सुरक्षित आहे.

**देशाच्या विकासाला चालना**

संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, लडाखसोबतच आज जम्मू-काश्मीर, चंदीगड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराममध्येही इतर प्रकल्प देशाला समर्पित केले जात आहेत. गेल्या काही वर्षांत, ज्या वेगाने आणि कौशल्याने बीआरओने सीमावर्ती भागात पायाभूत सुविधा निर्माण केल्या, त्यामुळे देशाच्या विकासालाही चालना मिळाली. कठीण प्रकल्पांना यशस्वीरित्या पूर्ण करून, बीआरओ आज दळणवळण आणि जोडणीचे दुसरे नाव बनले आहे. (वृत्तसंस्था)

### श्योक बोगदा अभियांत्रिकीचा चमत्कार

संरक्षण मंत्री म्हणाले की, श्योक बोगदा अभियांत्रिकीचा एक चमत्कार आहे. हा बोगदा या भागात प्रत्येक हंगामात विश्वसनीय दळणवळण सुनिश्चित करेल आणि कडाक्याच्या हिवाळ्यात जलद तैनातीची क्षमता वाढवेल. आज आम्ही लडाखमधील दारबुक-श्योक-दौलत बेग ओल्डी मार्गावर बांधलेल्या ९२० मीटर लांब श्योक बोगद्याचे उद्घाटन करत आहोत. जगातील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक प्रदेशांत बांधण्यात आलेली हा बोगदा अभियांत्रिकीचे अनोखे उदाहरण आहे. ■

# अमेरिका रशियाला ‘धोका’ संबोधणार नाही

## राष्ट्रीय सुरक्षा धोरणात बदल ● रशियाकडून बदलाचे स्वागत

◆ **वॉशिंग्टन डीसी, ७ डिसेंबर**

ट्रम्प प्रशासनाने आपल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात मोठा बदल केला आहे. यानुसार, अमेरिका आता रशियाला ‘धोका’ संबोधणार नाही. हे ट्रम्प यांच्या ‘अमेरिका फर्स्ट’ धोरणावर आधारित आहे.

रशियन प्रवक्ते दिमित्री पेसकोव यांनी सांगितले की, अमेरिकेने नुकतेच २९ पानांचे एक दस्तऐवज जारी केले. आता अमेरिका रशियासाठी थेट धोका आणि शत्रू म्हणणारी भाषा वापरणार नाही. रशियाने या बदलाचे स्वागत केले आहे. २०१४ मध्ये क्रिमियाला रशियामध्ये विलीन केल्यापासून आणि २०२२ मध्ये युक्रेनवर पूर्ण हल्ला केल्यापासून अमेरिका रशियाला मोठा धोका मानत होता. आता नवीन धोरणात रशियाबद्दल नरमाई दाखवण्यात आली आहे आणि काही मुद्द्यांवर सहकार्य करण्याची चर्चा केली आहे. तर ट्रम्प प्रशासनाने युरोपवर टीका करत म्हटले की, त्याचे अस्तित्व संपत आहे.

**युरोपबाबत कठोर भूमिका**

या दस्तऐवजात म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प त्यांच्या परराष्ट्र धोरणात फायदा पाहतात, परंतु तत्त्वे सोडत नाहीत, शक्तीचा वापर करतात, परंतु केवळ अमेरिकेच्या हितासाठी, जगाला सुधारण्याची जबाबदारी घेत नाहीत.

यात पुढे म्हटले आहे की, आम्ही खूप शक्तिशाली आहोत आणि गरज पडल्यास त्याचा वापर करू, परंतु विनाकारण युद्ध करणार नाही. ट्रम्प यांच्या नवीन राष्ट्रीय सुरक्षा धोरणाने केवळ रशियाबद्दल नरमाई दाखवली नाही, तर युरोपीय मित्र राष्ट्रांबद्दल कठोर भूमिका घेतली आहे. ट्रम्प यांच्या नवीन राष्ट्रीय सुरक्षा धोरणात युरोपला कठोर इशारा देण्यात आला आहे. दस्तावेजात म्हटले आहे की, जर युरोपची कृती अशीच राहिली तर २० वर्षांपेक्षाही कमी वेळेत युरोपचे अस्तित्व मिटेल. (वृत्तसंस्था)

### जे देशासाठी फायदेशीर तेच करा

हे नवीन अमेरिकन दस्तऐवज ट्रम्पच्या ‘लवचिक वास्तववाद’ या सिद्धांतावर आधारित आहे. यानुसार, आता अमेरिकेचे परराष्ट्र धोरण केवळ त्याच्या हितांवर आधारित असेल. याचा एकमेव निकष असेल अमेरिकेसाठी जे सर्वात जास्त फायदेशीर आहे, तेच करा. या दस्तऐवजात युक्रेन युद्ध शक्य तितक्या लवकर संपवण्याबद्दल सांगितले आहे. याला अमेरिकेचा विशेष अजेंडा म्हटले आहे. त्याचबरोबर रशियासोबत पुन्हा धोरणात्मक स्थिरता प्रस्थापित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे, जेणेकरून अणुबॉम्बच्या शर्यतीचा आणि युरोपमधील मोठ्या युद्धाचा धोका कमी होईल. व्यापारी लाभ मिळविण्यासाठी देखील अमेरिकेने हे धोरण स्वीकारल्याचे बोलले जात आहे. ■

# निवृत्त आयएएस अधिकारी शर्मा यांना पाच वर्षांची शिक्षा

## मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाचा निर्णय

◆ **गांधीनगर, ७ डिसेंबर**

निवृत्त आयएएस अधिकारी प्रदीप शर्मा यांना विशेष ईडी न्यायालयाने मनी लाँड्रिंग प्रकरणात दोषी ठरवत पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. त्यांच्यावर आधीच अनेक प्रलंबित खटले सुरू आहेत आणि या नवीन निकालामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

गांधीनगरमधील विशेष ईडी न्यायालयाने निवृत्त आयएएस अधिकारी प्रदीप शर्मा यांना भुजमधील एका कंपनीला बेकायदेशीर जमीन वाटप प्रकरणात मनी लाँड्रिंगप्रकरणी दोषी ठरवले. ईडीने मनी लाँड्रिंग प्रकरणात शर्मा यांची ६ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली होती आणि न्यायालयाने मालमत्ता सरकारकडे सोपवण्याचे आदेश दिले. हा मनी लाँड्रिंग खटला प्रदीप शर्मा, संजय शाह नावाचा व्यक्ती आणि इतर आरोपीविरुद्ध फसवणूक आणि गुन्हेगारी विश्वासघाताच्या आरोपाखाली दाखल केलेल्या एफआयआरशी जोडलेला आहे. यापूर्वी कच्छ न्यायालयाने प्रदीप शर्मा यांना पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. (वृत्तसंस्था)

# रशियाचे युक्रेनवर क्षेपणास्त्र हल्ले

## युद्ध थांबवण्यासाठी युक्रेन-अमेरिका चर्चा निष्फळ

◆ **मॉस्को, ७ डिसेंबर**

युक्रेनमध्ये सशस्त्र सेना दिनापूर्वी रशियाने मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केले. युक्रेनियन हवाई दलाच्या माहितीनुसार, रशियाने २९ ठिकाणांवर ६५३ ड्रोन आणि ५१ क्षेपणास्त्रे डागली. यापैकी ५८५ ड्रोन आणि ३० क्षेपणास्त्रे पाडण्यात आली. देशभरात ८ लोक जखमी झाले.

अनेक ऊर्जा केंद्रे आणि रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. झापोरिझ्झिया अणुऊर्जा प्रकल्प काही काळासाठी ऑफ-साइट पॉवरपासून खंडित झाला होता, तथापि, अणुभट्ट्या बंद असल्यामुळे कोणताही मोठा धोका निर्माण झाला नाही. रशियानेही युक्रेनवर हवाई हल्ले केल्याचा आरोप केला आहे.



हल्ल्यानंतर युक्रेनियन आणि अमेरिकन अधिकाऱ्यांमधील तीन दिवसांची चर्चा कोणत्याही यशविना संपली. झेलेन्स्की यांनी ट्रम्प यांचे शांतता दूत स्टीव्ह विटकॉफ आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांचे जावई जेरेड कुशनर यांच्याशी फोनवर चर्चा केली होती.

दरम्यान, युरोपीय नेते सोमवारी लंडनमध्ये भेटण्याची तयारी करत आहेत. यापूर्वी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी अमेरिकेच्या हेतूंबद्दल शंका व्यक्त केली आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी इशारा दिला होता की अमेरिका युक्रेनला धोका देऊ शकते.

**तेल रिफायनरीजवरील हल्ले वाढवले**

रशियानेही दावा केला की त्यांनी रात्रभरात ११६ युक्रेनियन ड्रोन पाडले. त्याचबरोबर, युक्रेनने रशियाच्या रियाझान तेल रिफायनरीवर लांब पल्ल्याच्या ड्रोनने हल्ला केला.

युक्रेनियन सैन्य आणि रशियन प्रादेशिक अधिकाऱ्यांनी याची पुष्टी केली. गेल्या काही महिन्यांपासून युक्रेन रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर (रिफायनरीजवर) सातत्याने हल्ले करत आहे, जेणेकरून रशियाचे तेल निर्यातीतून मिळणारे उत्पन्न कमी होईल. रशिया भारतासारख्या देशांना मोठ्या प्रमाणावर तेल विकतो. युक्रेन-अमेरिकेचा आरोप आहे की, रशिया हेच तेल विकून युद्धासाठी शस्त्रे आणि क्षेपणास्त्रे बनवतो. (वृत्तसंस्था)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत चित्त्याच्या शावकाचा मृत्यू

◆ **ग्वाल्हेर, ७ डिसेंबर**

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर जिल्ह्यातील एका महामार्गावर रविवारी पहाटे कुनो राष्ट्रीय उद्यानातून (केएनपी) बाहेर पडलेल्या चित्त्याच्या शावकाचा अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले.

आग्रा-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर शिवपुरी जिल्ह्याच्या सीमेजवळ, येथून ३५ ते ४० किमी अंतरावर असलेल्या घाटीगाव परिसरात ही घटना घडली, असे ग्वाल्हेर क्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक अरविंद सक्सेना यांनी वृत्तसंस्थेला फोनवरून सांगितले.

सुमारे २० महिन्यांचे हे शावक कुनो राष्ट्रीय उद्यानातून बाहेर पडले होते व त्याच्या आईपासून वेगळे झाले होते. चित्त्याला धडक दिल्याचा संशय असलेल्या एका कारबद्दल त्यांना काही पुरावे मिळाले आहेत, असे पोलिस तपास पथकातील एका सदस्याने सांगितले.आम्ही महामार्गावरील वाहतूक कमी केली आहे व वेग कमी केला आहे, कारण एकाच आईपासून वेगळे झालेले दुसरे शावक अजूनही जवळ असू शकते. दोन्ही शावक आधी एकत्र दिसले होते, असे सक्सेना म्हणाले. ‘दुसरे शावक सुरक्षित आहे, असे राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) शुभराजण सेन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. मृत शावक हे दक्षिण आफ्रिकेतून आयात केलेल्या गामिनीचे अपत्य होते.शावक पिल्लू भारतातील चित्त्यांच्या संख्येला पुनरुज्जीवित करण्यास मदत करण्यासाठी होते. सात दशकांपूर्वी जगातील सर्वात वेगवान प्राणी चित्त्यांची संख्या कमी होत चालली होती. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### माधुरीने सांगितले नितळ सौंदर्याचे रहस्य



**मुंबई** : अभिनेत्री माधुरी दीक्षित वयाची पन्नाशी उलटल्यानंतरही अनेकांची आवडती आहे. वयाच्या ५८ व्या वर्षीही तिच्या नितळ त्वचेचे रहस्य काय, याविषयी स्वत: माधुरीने सांगितले की, त्वचेसाठी मॉईश्चरायझर, सनस्क्रिन आणि रेटिनॉईड अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र, बाहेरून सुंदर दिसण्यासाठी आतूनही तितकेच निरोगी असणे आवश्यक आहे. तुम्ही कितीही सौंदर्य प्रसाधने वापरली तरी एक गोष्ट कायम लक्षात असू द्यावी आणि ती म्हणजे सकारात्मकता. सौंदर्य हे केवळ प्रसाधनांमधून मिळत नाही. आपले मन देखील तेवढेच सुंदर असले पाहिजे. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे. कोणाबद्दलही नकारात्मक विचार करू नये. मला लोकांशी बोलायला आवडतं, त्यांच्या आयुष्याबद्दल जाणून घ्यायला आवडतं. मी काय आहे, कोण आहे, या गोष्टींचा मला फारसा फरक पडत नाही. अर्थात, आयुष्यात सकारत्मक ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी नियमित ओंकार आणि गायत्री मंत्राचा जप करते, असेही माधुरीने सांगितले. ■

### चार्ली चॅप्लीनची नात बनली खलनायिका

**कॅलिफोर्निया** : हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक जेम्स कॅमेरॉन यांचा ‘अवतार फायर अँड अॅश’ हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज आहे. वर्षातील सर्वात मोठ्या चित्रपटाचे काउंटडाउन जसजसे वेगवान होत आहे, तसतसे चित्रपट आणि चित्रपटातील पात्रे चर्चेत येत आहेत. एक नाव सतत चर्चेत आहे - वरंग. ते केवळ एक नवीन पात्र नाही, तर या चित्रपटाभोवती निर्माण झालेल्या खळबळ, रहस्य आणि प्रचंड उत्सुकतेचे धडधडणारे केंद्र आहे. अवतार: फायर अँड अॅश मध्ये प्रेक्षक पहिल्यांदाच पँडोराच्या खोलवर उतरतील, जिथे एक अगदी नवीन सभ्यता त्यांची वाट पाहत आहे, मंगक्वान जमात, ज्यांना अॅश पीपल म्हणूनही ओळखले जाते. या विलक्षण भूमिकेला पडद्यावर जिवंत करत आहेत उना चॅप्लीन, दिग्गज चार्ली चॅप्लीन यांची नात. वरंगला केवळ विरोधी पात्र म्हणून नव्हे, तर एक अशी नैसर्गिक शक्ती म्हणून सादर केले आहे, जी आपल्या ऊर्जेने कथेला दिशा देते. ‘अवतार: फायर अँड अॅश’ १९ डिसेंबर रोजी इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नडमध्ये प्रदर्शित होत आहे. ■



### ‘बोलविता धनी’ नाटकात दिसणार क्षितिज दाते

**मुंबई** : मराठी मनोरंजन जगतातील प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक, अभिनेता हृषिकेश जोशी यांच्या आगामी ‘बोलविता धनी’ या नाटकाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. याचे लेखन, दिग्दर्शन स्वत: हृषिकेश जोशी यांनी केले आहे. यात महत्त्वाची भूमिका अभिनेता क्षितिज दाते साकारणार आहे. विशेष म्हणजे क्षितिजने या नाटकात दोन अगदी वेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. तो म्हणाला की, या दोन्ही भूमिका एकमेकांपासून खूप वेगळ्या आहेत. त्यामुळे एकाच वेळी दोन वेगळी माणसे एकापाठोपाठ एक उभी करणे, हे माझ्यासाठी थोडे आव्हानात्मक आहे. नाटक दोन काळांमध्ये चालत राहतं. मुळात, मला हृषिकेश जोशींचं लिखाण प्रचंड आवडतं. त्यांची सगळी नाटकं मी पाहिली आहेत. त्यामुळे त्याने या नाटकासाठी विचारणा केली तेव्हा मी लगेचच होकार दिला. ■

# छत्तीसगडमध्ये कार-ट्रकच्या धडकेत पाच जणांचा मृत्यू



ट्रकच्या धडकेत कारचा चेंदामेंदा झाला

◆ **जशपूर, ७ डिसेंबर**

छत्तीसगडच्या जशपूर जिल्ह्यात रविवारी एका कारने ट्रकला धडक दिल्यामुळे ४ पुरुष व एका १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले.

दुलदुला पोलिस स्टेशन हद्दीतील पत्राटोली गावाजवळ पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला, जेव्हा मृत लोक जवळच्या मनोरा येथील मेळ्यात ऑर्केस्ट्रा शो पाहिल्यानंतर त्याच परिसरातील खटंगा या त्यांच्या मूळ गावी परत जात होते, असे त्यांनी सांगितले. कारची समोरासमोर धडक झाली व धडक इतकी जोरदार होती की कार पूर्णपणे चिरडली गेली. कारमधील पाचही जण जागीच मृत्युमुखी पडले, असे दुलदुला स्टेशन हाऊस ऑफिसर के.के. साहू यांनी सांगितले. घटनेनंतर काही ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तात्काळ पोलिसांना माहिती दिली. दुलदुला पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढले आणि शवविच्छेदनासाठी सामुदायिक आरोग्य केंद्रात पाठवले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. रामप्रसाद यादव, उदय कुमार चौहान, सागर त्रिकी, दीपक प्रधान आणि अंकित टिग्गा अशी मृतांची ओळख पटली आहे. हे तिघेही खटंगा येथील रहिवासी आहेत, असे त्यांनी सांगितले. अपघातानंतर ट्रक चालक आपले वाहन सोडून पळून गेला, त्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# चीनचा समुद्रात खोडसाळपणा जपानी लढाऊ विमानांचे ‘रडार लॉक’

◆ **टोकियो, ७ डिसेंबर**

लढाऊ विमानांवर क्षेपणास्त्र लॉकवरून जपान आणि चीन आमनेसामने आले आहेत. चीनच्या विमानवाहू जहाज लिओनिंगवरून उड्डाण करणाऱ्या एका लष्करी विमानाने जपानमधील ओकिनावाजवळ जपानी लढाऊ विमानांवर रडार लॉक मिळवला, ज्यामुळे जपानने चीनकडे निषेध नोंदवला. रडार लॉक म्हणजे लष्करी विमान जे त्याचे रडार दुसऱ्या विमानावर किंवा लक्ष्यावर अशा प्रकारे केंद्रित करते की ते सतत त्याची अचूक स्थिती, वेग आणि दिशा निरीक्षण करू शकते. थोडक्यात सांगायचे तर चीनने जपानी लढावू विमानांना लक्ष्य केले.



जपानच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की जे-१५ या चिनी लष्करी विमानाने शनिवारी दोनदा वेगवेगळ्या वेळी जपानी एफ-१५ लढाऊ विमानांवर रडार लॉक मिळवले. मंत्रालयाने सांगितले की हे एकदा दुपारी सुमारे तीन मिनिटे आणि पुन्हा संध्याकाळी सुमारे ३० मिनिटे घडले. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, चिनी विमानाने चिनी हवाई क्षेत्राच्या संभाव्य उल्लंघनाला प्रतिसाद देणाऱ्या जपानी लढाऊ विमानांवर रडार लॉक मिळवले. मंत्रालयाने म्हटले आहे की जपानी हवाई क्षेत्राचे कोणतेही उल्लंघन झाले नाही आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. दोन्ही रडार लॉक घटनांमध्ये तेच चिनी जे-१५ विमान सहभागी होते की नाही हे स्पष्ट नाही. जपानचे संरक्षण मंत्री शिंजिरो कोइझुमी यांनी रविवारी सकाळी पत्रकारांना सांगितले की, जपानने चीनकडे निषेध नोंदवला आहे आणि त्याला सुरक्षित विमान ऑपरेशन नियमांचे उल्लंघन करणारे ‘धोकादायक कृत्य’ म्हटले आहे. ते म्हणाले, अशा प्रकारची घटना अत्यंत निषेधार्ह आहे. आम्ही चीनकडे तीव्र निषेध नोंदवला आहे आणि अशा घटना रोखण्यासाठी कठोर उपाययोजनांची मागणी केली आहे.

**चीनचे स्पष्टीकरण**

चीनने गेल्या महिन्यातच फुजियान विमानवाहू जहाज तैनात केले होते. चीनने जपानचे आरोप फेटाळून लावले आहेत, ते म्हणाले की ते फक्त नियमित युद्धाभ्यास करत होते. चीनच्या राज्य माध्यमांनी, ग्लोबल टाईम्सने, नौदल प्रमुखांना सांगितले आहे की चीनला युद्धाभ्यासांची पूर्व माहिती असूनही जपानने हस्तक्षेप केला. चीनने मागणी केली की जपानने आघाडीच्या ओळींवर आपल्या हालचाली त्वरित थांबवाव्यात अन्यथा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार कारवाई केली जाईल. जूनमध्ये अशीच एक घटना घडली जेव्हा एका चिनी विमानाने जपानी लढाऊ विमानाच्या अगदी जवळून उड्डाण केले. (वृत्तसंस्था)

# दिव्यांग कैद्यांसाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करा : सुप्रीम कोर्ट

## राज्यांना निर्देश; भेदभाव सहन केला जाणार नाही

◆ **नवी दिल्ली, ७ डिसेंबर**



सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिव्यांग कैद्यांसाठी स्वतंत्र, सुलभ आणि मजबूत तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने शिक्षण, सुविधा, सहाय्यक उपकरणे आणि सतत देखरेख यासंदर्भातील निर्देश जारी केले.

एका प्रकरणावर सुनावणी करताना, न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने आदेशात म्हटले की, तक्रार यंत्रणा प्रभावी देखरेख आणि तक्रारींचे वेळेवर निराकरण सुनिश्चित करेल, ज्यामुळे कैद्यांना भेदभावपूर्ण वागणुकीपासून संरक्षण मिळेल. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी ४ महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करावा. न्यायालय आता पुढीलवर्षी ७ एप्रिल रोजी या प्रकरणाची सुनावणी करणार आहे. तुरुंगांमध्ये दिव्यांग कैद्यांना समावेशक शिक्षणाची अर्थपूर्ण उपलब्धता मिळावी यासाठी योग्य सुविधा निर्माण कराव्यात. केवळ दिव्यांगत्वामुळे कोणत्याही कैद्याला शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी नाकारली जाणार नाही. अंडरट्रायल किंवा दोषी म्हणून तुरुंगात असलेल्या दिव्यांग व्यक्तींना योग्य कायदेशीर चौकट आणि सुविधा देण्यासाठी सविस्तर निर्देश मागणाऱ्या याचिकेवर हा आदेश दिला. (वृत्तसंस्था)

### तुरुंगात अनुकूल सुविधा अनिवार्य

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

### जाहीर नोटीस

**अॅड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. अॅडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**
**विरुध्द**
सुदाम भारत रेडे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १३०/२०२५ | ३) सचिन रमेश ढवळे, वय-४४, धंदा-शेती, रा. सापटणे (टें) ता. माढा जि. सोलापूर | २१,२२,७८८ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

### जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधि. १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार माढा तालुक्यातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळच्या निवडणुकीसाठी निवडणूक कृती कार्यक्रम खालील प्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव | नामनिर्देशनपत्र दाखल करावयाची तारीख, वेळ व ठिकाण | नामनिर्देशनपत्र छाननीची तारीख, वेळ व ठिकाण | छाननीनंतर वैध नाम निर्देशन पत्रांची प्रसिध्द करावयाची तारीख, वेळ व ठिकाण | नामनिर्देशनपत्रा मागे घेण्याची तारीख, वेळ व ठिकाण | चिन्ह वाटप व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दीची तारीख | मतदान तारीख, वेळ व मतमोजणी तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजमुद्रा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर | श्री. ए. एन. शिंदे, सहा. निबंधक | दि. ०८/१२/२०२५ ते दि. १२/१२/२०२५ वेळ स.११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि. १५/१२/२०२५ स.११.०० वा.पासून ते छाननी संपेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि. १६/१२/२०२५ स. ११.०० वा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटिस बोर्डावर | दि. १६/१२/२०२५ ते दि.३०/१२/२०२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि.३१/१२/२०२५ स.११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि.११/०१/२०२६ वेळ-स. ८.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत व मतमोजणी मतदान संपलेनंतर लगेच |
| २ | बबनराव शिंदे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बेंबळे, ता. माढा, जि. सोलापूर | श्रीमती एल. पी. बागल, सहा. सह. अधि. | | | | | | |

**सही/-**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा**

# सहा कोटींचा कर्जबोजाच्या जमिनीची परस्पर विक्री करणाऱ्या ११ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ७ डिसेंबर-**

बारामती सहकारी बँक लि. शाखा, बार्शी यांच्या मालकीच्या कर्जबोजा असलेल्या जमिनीची अप्रामाणिकरीत्या विक्री करून बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी ११ जणांवर बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ मार्च २०२२ ते १७ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत घडली असून एकूण सहा कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे.




या प्रकरणी शाखाधिकारी दगडू दत्तात्रय लोंबतुरे (वय ५४), रा. बाळे, जि. सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे. रंगा भिमा मोरे, परशुराम भिमा मोरे, यल्लाप्पा भिमा मोरे, अशोक भिमा मोरे, लक्ष्मीबाई भिमा गायकवाड, रंगूबाई लक्ष्मण गायकवाड, मेल्लूबाई भिमा गायकवाड, महमद --इम्रान जहाँगीर काझी नाईकवाडी प्लॉट, बार्शीरिजवान जहाँगीर काझी नाईकवाडी प्लॉट, बार्शी कुंडलिक यशवंत शेंडगे शेंडगे प्लॉट, उपळाई --रोड, राजेंद्र विठ्ठल नागणे हेडेगल्ली, बार्श सर्व आरोपींवर कलम ४०६, ४२०, ४२१, ४२२, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, गट क्र. ८९९/१/ड, क्षेत्र ०० हे. ३८ आर असलेली जमीन बारामती सहकारी बँकेकडून सहा कोटी कर्जावर गहाण ठेवलेली होती. या जमिनीवर बोजा असतानाही रंगा भिमा मोरे यांनी ती जमीन तृतीय पक्षांना विक्री केली. विक्रीपूर्वी बँकेची एनओसी घेणे आवश्यक असतानाही तसे न करता आरोपींनी संगनमताने जमीन विकली. महंमद इम्रान काझी व रिजवान काझी यांनी ही जमीन विकत घेतल्याने बँकेच्या हक्कांवर आणि पुनर्प्राप्तीवर अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# मित्रपक्षांसोबत युतीविषयी भाजपाच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेणार : तडवळकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या आगामी निवडणुकीत मित्रपक्षांसोबत युती करण्याविषयी प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे यांच्यासह निवडणूक संचालन समिती, कोअर कमिटीच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे, असे भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी सांगितले.



भारतीय जनता पक्षाचा प्रवेश करताना इतर पक्षातील कोणत्याही नेत्या, कार्यकर्त्यांना सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी देण्याचा शब्द पक्षाने दिलेला नाही. निवडून येण्याची पात्रता हाच उमेदवारीसाठी निकष असणार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. दरम्यान, भाजप शहराध्यक्ष तडवळकर यांच्या या भूमिकेने इतर पक्षातून भारतीय जनता पक्षात उमेदवारीच्या अपेक्षेने प्रवेश केलेल्या अनेक कार्यकर्त्यांचे धाबे दणाणले आहे.

भारतीय जनता पार्टीकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांसाठी शनिवार ६ डिसेंबर पासून शहर कार्यालयातून अर्ज वाटप सुरु करण्यात आले आहे. दि.१३ डिसेंबर पर्यंत संबंधित उमेदवारांनी संपूर्ण माहिती व कागदपत्रासह उमेदवारी अर्ज शहर कार्यालयात दाखल करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयातून अर्ज घेण्यासाठी इच्छुकांची गर्दी वाढत असल्याचे दिसून येत आहे.

यावेळी निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी, प्रा.डॉ.नारायण बनसोडे, डॉ.शिवराज सरतापे, विजया वड्डेपल्ली, रंजिता चाकोते यांच्यासह भाजपाप्रणित विविध मोर्चा-आघाडी सेल प्रमुख, मंडल अध्यक्ष आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुचाकीला बुलेटची धडक; एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

नवीन विडी घरकुल परिसरात दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एम आयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात बुलेटस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अंदाजे ७ वाजता फिर्यादी नरेश राऊल यांचे आई-वडील आपल्या दुचाकी क्रमांक एमएच १३ ईएन ६८९० वरून घराकडे जात होते. त्यावेळी बुलेट क्रमांक एमएच १३ सीएफ ४७९७ या वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात फिर्यादीच्या वडिलांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेनंतर बुलेटस्वार पसार झाला असून तो अद्याप अज्ञात आहे. या प्रकरणी अज्ञात बुलेट चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल गायकवाड करीत आहेत.

# १०१ व्या नाट्य संमेलन अध्यक्षपदासाठी सोलापूर शाखेकडून मोहन जोशींचे नाव आघाडीवर

## पुण्याचे सुरेश साखळकरही चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

सोलापूर दि.६ - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०१ व्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी सोलापूर शाखेकडून ज्येष्ठ नाट्य कलावंत. मोहन जोशी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. परिषदेच्या मध्यवर्ती शाखेकडून आलेल्या सूचनेनुसार, अध्यक्षपदासाठी नावे सुचवण्याकरिता सोलापूर शाखेच्या कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण सभा पार पडली.

रविवार, दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या स्व. पद्माकर देव सभागृहात परिषदेचे अध्यक्ष मा. प्रकाशजी यलगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी सभा संपन्न झाली. या सभेत १०१ व्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीच्या नावावर सविस्तर चर्चा झाली. मोहन जोशी यांनी नाट्य क्षेत्रातील तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेच्या माध्यमातून केलेले कार्य अतुलनीय आणि अविस्मरणीय आहे. या कार्याची दखल घेऊन, मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या १०१ व्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी श्री. मोहन जोशी यांचेच नाव सोलापूर शाखेच्या वतीने सुचवण्यात यावे, असा बहुमताने सूर निघाला.

दरम्यान, आजीव सदस्य नितीन दिवाकर यांनी याप्रसंगी पुण्याचे सुरेश साखळकर यांचे नावदेखील अध्यक्षपदासाठी सुचवले, ज्यामुळे या दोन नावांची चर्चा सध्या नाट्य वर्तुळात रंगू लागली आहे.

या महत्त्वाच्या सभेस अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, निमंत्रित सदस्य आणि सल्लागार मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोलापूर शाखेने सुचवलेले नाव आता मध्यवर्ती शाखेकडे पाठवले जाईल आणि अंतिम निर्णय परिषदेकडून घेतला जाईल.

# खिळ्याला अडकवलेली चावी वापरुन दोन लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत अज्ञात चोरट्याने घराबाहेर खिळ्याला अडकवलेली चावी वापरून घराचे कुलूप उघडत चोरी केल्याची घटना ५ डिसेंबर रोजी उघडकीस आली.

या प्रकरणी फिर्यादी लखन भगतसिंग पिंगुवाले वय २५, रा. बालाजी हौसिंग सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ०५ डिसेंबर रोजी सकाळी ६.३० ते दुपारी २.०० या वेळेत चोरट्याने फिर्यादी यांच्या बंद घराचे मुख्य दरवाजाचे कुलूप चावीच्या सहाय्याने उघडून घरात प्रवेश केला. बेडरुममधील लोखंडी कपाटातून सुमारे दोन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. यामध्ये १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चौकड्या, १० ग्रॅमची जवारी माळ, १० ग्रॅमचे ठुसी (२ नग), ५ ग्रॅमचे सेबत पिस, २.५ ग्रॅमचे जुबा, २.५ ग्रॅमची अंगठी, २.५ ग्रॅमची कानातील फुल, २.५ ग्रॅमची सोन्याची बाली असा ऐवज समाविष्ट आहे.

फिर्यादींना चोरीची माहिती दि. ०६ डिसेंबर रोजी पहाटे १.४९ वाजता कळली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलिस उपनिरीक्षक चंदनशिव हे करीत आहेत.



# सराफ सुवर्णकार व्यापारी असोसिएशनच्यावतीने पोलिसांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

विजापूर नाका परिसरातील समर्थ ज्वेलर्सवर दरोडेखोरांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला होता. सराफाच्या प्रसंगावधानाने त्यांचा प्रयत्न फसला परंतु चोरांनी विविध युक्त्या वापरून स्वतःची ओळख लपवण्याचा प्रयत्न केला, परंतु गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा गुन्हा उघडकीस आणून सराईत गुन्हेगारांना वेळीच जेरबंद केल्याने सराफ सुवर्णकार व्यापारी असोसिएशनच्यावतीने सराफ कट्टा येथे सोलापूर क्राईम ब्रांच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, एपीआय शंकर धायगुडे, निलेश सोनवणे, पीएसआय मुकेश गायकवाड, पोलीस महासंचालक प्रमाणपत्र धारक दादासाहेब सरवदे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश देवरमणी यांनी असे कर्तबगार अधिकारी पोलीस दलाची शान असल्याचे सांगितले तर पोलीस दलाच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी आभार मानून व्यापाऱ्यांना काळजी घेण्याचे सूचना केल्या. महेश धाराशिवकर यांनी आभार मानले.

याप्रसंगी पूर्वी विभाग अध्यक्ष व्यंकटेश बिटला, प्रकाश चडचणकर, अमित काबणे, प्रदीप भोळा, सोमशंकर कंठीमठ, नागेंद्र रायकर, अनिल बिराजदार, दिगंबर पालनकर, अनिल रेवणकर, सुधाकर शहाणे, भाईकट्टी सराफ, कपिल वेर्णेकर, अनुप रायकर, अभिषेक रामपुरे आदी सराफ व्यापारी उपस्थित होते.

# उध्दव नगर येथील स्वामी समर्थ मंदिरात धार्मिक कार्यक्रम संपन्न




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त.. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा.. या जयघोषात जुळे सोलापूरातील उद्धवनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्तजन्मोसवाचा पाळणा व गुलाला धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांना अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्ताचे रूप साकारण्यात आले होते.

यावेळी सुहासिनी महिलांनी पाळणा गीत गाऊन जन्मोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न केला. यावेळी श्रींचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची एकच गर्दी होती. श्रींना मिष्ठांन्न तसेच फळांचे नैवेद्य अर्पण करण्यात आले.

यावेळी उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. साऱ्या मंदिर परिसरात प्रसन्न आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी मनोज कुमार अलकुंटे, ज्योती अलकुंटे यांच्यासह श्री लक्ष्मी समर्थ परिवाराने विविध धार्मिक कार्यक्रम तसेच महाप्रसादाचे आयोजन केले.



# एचआयव्ही दिनानिमित्त 'साकव'तर्फे बालकांना पोषण आहार वाटप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

जागतिक एचआयव्ही दिनाचे औचित्य साधून साकव फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत एक उपक्रम राबवला.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.जगदीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विहान कार्यालयात एचआयव्ही प्रभावित बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी तय्यब शेख, आदिल शेख, मरीस्वामी जगले, सुरेखा घोडके आदी उपस्थित होते.एचआयव्ही प्रभावित बालकांमध्ये पौष्टिक आहाराची जाणीव वाढवणे, त्यांना आरोग्यदायी जगण्यासाठी आवश्यक आधार देणे आणि समाजातील सर्वसमावेशकतेचा संदेश पोहोचवणे हा उद्देश साधला गेला.

साकव फाउंडेशन गेल्या पंधरा वर्षापासून एचआयव्ही प्रभावित बालक, महिला, तसेच गरजूंसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवत असून मानवीयतेला केंद्रस्थानी ठेवून समाजातील उपेक्षित घटकांना बळ देणे हे साकवचे मुख्य उद्दिष्ट आहे.

डॉ.जगदीश पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, एचआयव्ही प्रभावित बालकांचे पोषण, आरोग्य व शिक्षण हा साकव फाउंडेशनचा सातत्याने प्राधान्यक्रम राहिला आहे. समाजाने या मुलांकडे सहानुभूतीने पाहणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हातभार लावणे ही काळाची गरज आहे.

# युवतींनी रडायचा नव्हे लढायचा करावा निर्धार : सुनील घनवट






## पर्समध्ये ठेवा मिरची पूड अन् पेपर स्प्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर-**

स्वरक्षण हा आपल्या प्रत्येकाचा अधिकार आहे. स्वसंरक्षण, सामर्थ्य, स्वाभिमान निर्माण करण्यासाठी हिंदु जनजागृती समितीकडून शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराच्या माध्यमातून युवतींनी रडायचे नव्हे लढायचा निर्धार करावा, असे प्रतिपादन सुनील घनवट यांनी केले.

> या शिबिरात 'आंतरराष्ट्रीय नेमबाज' तेजस्विनी सावंत, 'आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टर' स्नेहांकीता वरुटे, 'आंतरराष्ट्रीय आर्यनमॅन' माहेश्वरी सरनोबत, सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट, सव्यसाची गुरुकुलमचे प्रधान आचार्य लखन जाधव, उद्योजक नितीन वाडीकर, कोल्हापूर जिल्ह्यातील पोलीस प्रशासनामधील निर्भया पथकात कार्यरत बाबासाहेब कोळेकर यांनी उपस्थितांना संबोधित केले.

लखन जाधव याप्रसंगी बोलताना म्हणाले, नवरात्रात ज्याप्रमाणे देवीने राक्षसांचे निर्दालन केले त्याचप्रमाणे आपणही आपल्यातील शक्ती जागृत करून हिंदु राष्ट्रासाठी कार्य केले पाहिजे. नितीन वाडीकर म्हणाले, 'केवळ शरीर सक्षम असून उपयोग नाही, तर मनही सक्षम असणे आवश्यक आहे.

सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये म्हणाल्या, युवतींनी कोणाशीही व्यवहार करताना सतर्क रहावे. आपला मोबाईल नंबर किंवा हॅण्डसेट अनोळखी व्यक्तींना दिला जाणार नाही, याची काळजी घ्यावी, तसेच आपल्या पर्समध्ये सुरक्षिततेसाठी मिरची पूड, पेपर स्प्रेपण ठेवावा.

निर्भया पथकाचे पोलीस हवालादार बाबासाहेब कोळेकर म्हणाले, आज शिकवलेल्या शिबिरातून जर प्रत्येक युवतीने जर स्वरक्षण केले, तर समाजात घडणार्या अपप्रवृत्तींना निश्चित आळा बसेल. पोलीस आणि कायदा तुमच्या पाठीशी असून निर्भया पथक २४ तास तुमच्या पाठिशी आहे.

तेजस्वीनी सावंत म्हणाल्या, युवतींनो स्वसंरक्षण प्रशिक्षित होऊन स्वत:ला सक्षम बनवा. स्वरक्षण प्रशिक्षाच्या माध्यमातून युवतींचा आत्मविश्वास वाढतो आणि नवी ओळख निर्माण होते. प्रशिक्षत झाल्यास आपल्याला संकटांतून निभावून जाण्याचे बळ मिळते.

स्नेहांकिता वरुटे म्हणाल्या, युवतींनी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज आहे. समाजाने 'स्त्री'चा सन्मान केला पाहिजे. प्रशिक्षण म्हणजे कला नसून आत्मसंरक्षण आणि आत्मविश्वास वाढवणारी व्यवस्था आहे. समाजातील विघातक प्रवृत्तींपासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी युवतींनी स्वरक्षण प्रशिक्षण घेणे महत्वाचे आहे.

दरम्यान, प्रख्यात सायकलपटू शौर्या शिंदे हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी वंदना बंबलवाड, अश्विनी माळकर, अर्चना गुरव, जयंतीलाल पटेल, अशोक गुरव, सनी पेनकर, सुरेश यादव, राजू यादव, विकास जाधव, प्रशांत पाटील, अमर जाधव, गजानन तोडकर, आनंदराव काशीद, योगेश केरकर, दीपक खोत उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तामलवाडी पोलिसांचा सनराईज स्कूलला भेटी दौरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

पोलिस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत तामलवाडी पोलिस ठाण्याच्या पथकाने दि. ६ डिसेंबर रोजी सनराईज स्कूल, तामलवाडी येथे भेट देत विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

सदर भेटीत तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकुर, महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस हवालदार पंडीत शिंदे, नितीन मुळे, सायबर पोलीस ठाण्याचे पोअं. मकसुद काझी, नितीन भोसले, गोपाल सलगर, उमेश माने तसेच मपोहेकॉ कोरे सहभागी होते.

विद्यार्थ्यांना पोलिसांविषयी समज-गैरसमज, वाहतुकीचे नियम, बाललैंगिक अत्याचार, भारतीय न्याय संहिता व पोक्सो कायद्यातील बालकांच्या सुरक्षेबाबतची कलमे, व्यसनमुक्ती, गुड टच-बॅड टच, डायल ११२, सायबर गुन्हे आणि सोशल मीडियावरील सुरक्षितता या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे समुपदेशनही करण्यात आले.

या उपक्रमात सनराईज स्कूलचे सुमारे ८०० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



## संगीतकार व गायक अजय गोगावले यांनी सहकुटुंब घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.७ डिसेंबर -**

भारतीय संगीतविश्वातील लोकप्रिय संगीतकार अजय-अतुल या जोडगोळीतील गायक अजय गोगावले यांनी आज सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. अजय गोगावले यांची परंपरागत रीतीरिवाजांनुसार पुजारी सचिन अमृतराव यांनी देवीचे कुलधर्म कुलाचार पुजा केली. त्यांनतर गोगावले कुटुंबीयांनी श्री तुळजाभवानी देवीची ओटी पुजाऱ्यांच्या हस्ते भरून देवीची आरती करत मनोभावे देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा व महावस्त्र भेट देत अजय गोगावले यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी अर्जुन चौधर, अनुप ढमाले, रामेश्वर वाले, अनिरुद्ध देशपांडे, दिनेश निकवाडे, विक्रम कदम, नवनाथ खिंडकर तसेच मंदिर संस्थानचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.



## दिव्यांग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

जागतिक दिव्यांग सप्ताह निमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. जागतिक दिव्यांग सप्ताहात समावेशीत शिक्षण विभागाकडून मोफत वाटप करण्यात आलेल्या अलीम्को साहित्या मधील व्हीलचेअर व अध्ययन अध्यापन साहित्याचे किटच्या वापराबद्दल पालक व शिक्षक यांना कास्ती केंद्राचे केंद्रस्तरीय विशेष शिक्षक प्रकाश लांडगे यांनी माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना विशेष शिक्षक प्रकाश लांडगे यांनी हा दिवस फक्त औपचारिकता नाही, तर समाजातील दिव्यांग विद्यार्थ्याविषयी आदर, संवेदना आणि समानतेचा संदेश देणारा दिवस आहे. यावेळी मुख्याध्यापक सुरेश वाघमोडे, रमेश खटके, युवराज बनकर, कैलास माणिकशेट्टी, वर्षा चौधरी, महानंदा राठोड आदी उपस्थित होते.



## स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती साजरी

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

बालाजी नगर येथील स्वातंत्र्य सैनिक कॉलनीतील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंतीनिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर दरम्यान गुरुचरित्र पारायण, भजन, प्रवचन, कीर्तन आणि महाप्रसाद यांसारखे विविध कार्यक्रम पार पडले. दि.४ डिसेंबर रोजी सुनील विटकर व विनायक जाधव यांच्या हस्ते यज्ञपूजा, स्वामी समर्थ महाराजांची नगर प्रदक्षिणा व हभप पूजाताई कुंभार महाराज (बारामती) यांचे कीर्तन झाले. महिलांच्या भजनी मंडळाने भजन सेवा केली. सायंकाळी दिनेश बंडगर यांनी आरती केली तर प्रजापती विष्णू प्रभू यांनी प्रवचन दिले. कार्यक्रमासाठी यशवंत सोनटक्के, संतोष क्षीरसागर, ओंकार वायकर आदींनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिल्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

# तुळजापूरमध्ये ‘कोण होणार नगराध्यक्ष?’ ; पैजा लावण्यात नागरिक व्यस्त




### भाजप विरुद्ध काँग्रेसच्या दुरंगी लढतीवर नागरिकांचा कयास...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.७ डिसेंबर -**

तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीतील अटीतटीच्या लढतीत भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद गंगणे आणि काँग्रेसचे उमेदवार अमर मगर यांच्यात चुरस निर्माण झाली असून नगरपरिषदेत कोणाचा झेंडा फडकेल याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. शहरातील नागरिकांमध्ये निकालावरून तर्क-वितर्क रंगले असून अनेक ठिकाणी ‘कोण जिंकणार?’ यावर पैजा लावण्यापर्यंत वातावरण तापले आहे.

शहरातील प्रत्येक चौकात नागरिकांचे घोळके जमून निकालाबाबत चर्चेला उधाण आले आहे. मागील पंधरा वर्षातील विकासकामे, भ्रष्टाचाराच्या चर्चा, तसेच पुढील राजकीय समीकरणांवर जोरदार चर्चा नागरिक करताना दिसत आहेत. दोन्हीही प्रमुख उमेदवार प्रचंड आत्मविश्वासात असल्याने मीच जिंकणार असे ठाम विधान दोन्हीकडून करण्यात येत आहे.

नगरपरिषदेत ११ प्रभागांसाठी २२ नगरसेवक निवडून येणार असून सर्वच प्रभागांमध्ये समान चुरस पाहायला मिळत आहे. त्यामुळे



नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांच्या उमेदवारांमध्ये धाकधूक स्पष्टपणे जाणवत आहे. प्रभाग क्रमांक ३, ५, ७, ८, ९ आणि १० मध्ये तर विशेषतः काट्याची टक्कर झाल्याचे मतदारांमध्ये बोलले जात आहे.

अनेक प्रभागांत क्रॉस वोटिंग झाल्याची चर्चा सुरू असून त्यामुळे निकाल अपेक्षेपेक्षा धक्कादायक येण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. दररोज नागरिक वेगवेगळे अंदाज वर्तवत असून एकमताने कोणाच्याही बाजूने निकाल लागेल असे ठामपणे सांगता येत नाही.

प्रचार काळात भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांनी जोरदार मोहीम राबवली. मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांनी विविध उपाययोजना केल्या.

### सर्व उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये कैद

नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार, तर ११ प्रभागांसाठी ६२ नगरसेवक उमेदवार रिंगणात होते. प्रभाग क्रमांक ३ मध्ये भाजपचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने आता ६२ पैकी २२ आणि नगराध्यक्ष पदासाठी ७ पैकी एक उमेदवार २१ डिसेंबर रोजी निवडून येणार आहे.

दिवसरात्र मेहनत घेत प्रचार झोकात सुरू होता. मतदानानंतर भाजप कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून उत्साह व्यक्त केला असला, तरी काँग्रेसने यावर टीका करत भुतावळेपणा न करता निकालानंतर गुलाल आम्हीच उधळणार असा विश्वास व्यक्त केला.

आता २१ डिसेंबरच्या निकालानंतरच गुलाल कोण उधळणार आणि विजयाचा तुरा कोणाच्या माथी मिरवणार हे स्पष्ट होणार आहे.

तोपर्यंत तुळजापूरमध्ये राजकीय चर्चा अधिकच रंगत जाणार हे निश्चित. भाजपने २२ प्लस एक आमचाच विजय असा दावा करीत आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

## तेरा वर्षानंतर नरसिंह साखर कारखाना पुन्हा सुरु

### वाशी तालुक्यात आनंदाची लाट...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात राष्ट्रीय महामार्गालगत असलेला नरसिंह साखर कारखाना मागील तेरा वर्षांपासून बंद अवस्थेत होता. दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर ८ डिसेंबर रोजी कारखान्याची धुराडी पुन्हा पेटणार असल्याची माहिती सावंत ग्रुपकडून देण्यात आली आहे.

माजी मंत्री व परंडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तानाजी सावंत यांच्या भैरवनाथ ग्रुपने हा कारखाना कायमस्वरूपी खरेदी करून कार्यान्वित केला आहे. कारखाना बंद असल्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच परिसरातील रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात घटल्या होत्या. कारखाना सुरू झाल्याने आता ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, वाहनधारक, तसेच स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिसरातील आर्थिक चक्राला पुन्हा गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आठ डिसेंबर रोजी भैरवनाथ ग्रुपचे चेअरमन अनिल सावंत यांच्या शुभहस्ते कारखान्याच्या प्रथम हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदीपन सोहळा पार पडणार आहे.

## नळदुर्गातील मैलारपुरात तिसऱ्या खेट्याला भाविकांची गर्दी

### ‘येळकोट जय मल्हार’च्या गजरात दर्शनासाठी रांगा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

‘येळकोट, येळकोट जय मल्हार!’च्या गजरात नळदुर्ग (मैलारपुर) येथे रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी तिसऱ्या खेट्याला श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पावणेदोन महिन्यांच्या पारंपरिक वास्तव्यासाठी श्री खंडोबा देव श्रीक्षेत्र मैलारपुर येथे आल्यानंतर दर रविवारी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. त्यानुसार तिसऱ्या खेट्यालाही पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, भाविकांकडून दंडवत घालणे, बाशिंग चढविणे, नैवेद्य दाखविणे, विविध नवस फेडणे, तसेच मंदिरावर खोबरे आणि भंडारा उधळण्याचा



धार्मिक सोहळा उत्साहात पार पडला. यंदाची वार्षिक श्री खंडोबा यात्रा दि.२ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत श्रीक्षेत्र मैलारपुर येथे होणार आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यांतून तब्बल ५ ते ६ लाख भाविक या यात्रेला हजेरी लावतात. यात्रेपूर्वी दर रविवारी मैलारपुर परिसरात ‘मिनी यात्रा’सदृश वातावरण निर्माण होत आहे.

स्थानिक नळदुर्ग शहर व परिसरातील भाविक सुद्धा मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे दाखल होत आहेत. दर रविवारी श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टतर्फे भाविकांसाठी अन्नदान आयोजित केले जाते.

## परंडा तालुक्यात गोवंश बेकायदेशीर वाहतूक

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

देवगाव रोड, परंडा येथे बेकायदेशीररीत्या गोवंशाची वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीस ताब्यात घेतले. आरोपी गौस अब्बास कुरेशी (वय २७) हा दि.६ डिसेंबर रोजी रात्री ९.५० वाजता जिकिरे यांच्या पडीक जमिनीतून कुर्डुवाडी रोडकडे विना नंबर पिकअप वाहनाने गोवंश वाहतूक करताना आढळला. वाहनातून गोवंशीय जातीचे २ वासरे व १ जर्सी गाय असा एकूण किंमत २,३५,००० रुपये मालमत्ता मिळून आली.

## भैरवनाथ शुगर कारखान्याकडून ऊस उत्पादकांना २८०० रुपये पहिली उचल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तांदूळवाडी येथील भैरवनाथ शुगर कारखान्याने चालू गाळप हंगाम २०२५-२६ साठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रती मे.टन २८०० रुपये पहिली उचल जाहीर केली आहे.

हा निर्णय माजी मंत्री व आमदार तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेण्यात आल्याची माहिती चेअरमन अनिल सावंत व व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांनी दिली.



कारखान्याचा गाळप आज अखेर ५७,२९५ मे.टन इतका झाला असून गाळप प्रक्रिया वेगाने सुरू आहे. शेतकऱ्यांचा एकही टन ऊस न शिल्लक ठेवता पूर्ण गाळप करण्याचे कटिबद्ध आश्वासन व्यवस्थापनाने दिले आहे.

## यशोदाबाई पाटील हायस्कूलमध्ये जागतिक दिव्यांग सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील नागुर येथील यशोदाबाई पाटील हायस्कूल येथे जागतिक दिव्यांग सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ती केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक सुदर्शन जावळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख मोहन शेवाळे व केंद्रस्तरीय विशेष शिक्षक प्रकाश लांडगे उपस्थित होते

कार्यक्रमादरम्यान समावेशीत शिक्षण विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या विविध सेवा, सुविधा व साहित्याविषयी पालक आणि शिक्षकांना माहिती देण्यात आली. शाळेतील दिव्यांग विद्यार्थी प्रथमेश घोडके याला अलीम्को साहित्यामधील व्हीलचेअर आणि अध्ययन-अध्यापन साहित्याचे किट मोफत देण्यात आले. या साहित्याच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन विशेष शिक्षक लांडगे यांनी केले. दिव्यांग व्यक्तींना समान संधी, सहभाग आणि समाजात संवेदनशीलता वाढवणे हे त्यामागचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक तानाजी जाधव, सहशिक्षक अनिल गाडेकर, दत्ता राठोड, व्यंकट शिंदे तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक तानाजी जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.

## महावितरणमध्ये प्रीतम गव्हाणे यांची निवड; ‘जयप्रकाश’मध्ये सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील माजी विद्यार्थी प्रीतम चंद्रकांत गव्हाणे यांची महावितरण (विद्युत) विभागात विद्युत सहाय्यक पदावर नियुक्ती झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.



कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, माजी जि. प. सदस्य रामदास अण्णा कोळगे, माजी ग्रा. प. सदस्य राजनारायण कोळगे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश शेटे यांनी मानले.

# अविष्कार कला ग्रुपची आरळी बुद्रुक येथे रंगतेय हौशी गायकांची मैफिल

### स्थानीक कलाकारांनी सुरु केलेल्या उपक्रमातून शेकडो गायकांना मिळाला मंच...

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

ग्रामीण भागातील हौशी गायकांसाठी संधीचे व्यासपीठ ठरलेला अविष्कार कला ग्रुप आता वेगाने वाढत असून या उपक्रमामुळे शेकडो नवोदित गायकांना त्यांच्या कलेचा परिचय जगासमोर करून देण्याची संधी मिळत आहे. तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथे सुरू झालेली ही दैनंदिन ऑनलाइन मैफल ग्रामीण संगीतविश्वात लक्षवेधी ठरत आहे.

आरळी बुद्रुक मधील प्रगतशील शेतकरी असणारे प्रशांत व्हरकट, दादा उळेकर, भीमराव गवळी, विकास ज्योत आणि रवी उळेकर या कलाप्रेमिंनी एकत्र येत गावात छोट्या स्वरूपात मैफिलींची सुरूवात केली. मुंबई सारख्या कलानगरीत गावचे भुषण असणारे प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाजाभाई सय्यद दैनंदिन या ग्रुपला साथ आणि प्रोत्साहन देत असतात. स्वतः ही ऑनलाईन पद्धतीने सहभागी असतात. मात्र या छोट्या उपक्रमाचा आज मोठा कलाविष्कार झाल्याचे पाहायला मिळत आहे.

> आरळी सारख्या ग्रामीण भागात दररोज सादर होणाऱ्या विविध गीतप्रकारांमुळे भावगीत, भक्तिगीत, सुगम संगीत, मराठी-हिंदी फिल्मी गीते श्रोते या मैफिलीशी घट्टपणे जोडले जात आहेत. वॉट्सअप, फेसबुक, युट्युब ऑनलाईनच्या माध्यमातून जोडलेले असंख्य चाहते मेसेज करून दाद देत आहेत. ग्रामीण भागातील हौशी कला अशाप्रकारे जपली आणि पुढे नेली जात आहे ही मोठी गोष्ट आहे.ऑनलाईन श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हीच बाब ऊर्जात्मक आहे.
>
> **- खाजाभाई सय्यद,** प्रसिद्ध आर्ट डिझायनर तथा अविष्कार कला ग्रुप सदस्य मुंबई

त्यांच्या प्रयत्नांमुळे सुरू झालेल्या या मैफिलीचा प्रवास सध्या इतका विस्तारला आहे की जवळपास शेकडो हौशी गायकांना या माध्यमातून ऑनलाइन आणि प्रत्यक्ष सादरीकरणाचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. दहा वर्ष वयाच्या मुलांपासुन ते ६५ वर्षापर्यंतचे नागरिक या स्टुडिओत जाऊन गीत गात आहेत. सुरुवातीला फक्त आरळी बुद्रुकमध्ये मर्यादित असलेला हा उपक्रम काही महिन्यांतच अणदूर, धाराशिव, तुळजापूर, उमरगा, सोलापूर आणि मुंबईपर्यंत पोहोचला आहे. मुंबईसह विविध शहरांतील कलाकार प्रत्यक्ष आरळी बुद्रुक येथे येऊन आपली कला सादर करत आहेत, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरत आहे.

### दैनंदिन फर्माईश गीतांची ऑनलाइन प्रस्तुती...

या ग्रुपने सुरू केलेल्या ऑनलाइन फर्माईश गीतांच्या मैफिलीत दररोज विविध गायक आपल्या आवाजाची जादू सादर करतात. फेसबुक लाइव्ह, यूट्यूब आणि व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून ही गायन मैफल नियमितपणे सादर केली जाते. श्रोत्यांकडून येणाऱ्या फर्माईशींमुळे प्रत्येक दिवस नवनव्या गाण्यांनी रंगतो आणि यामुळे कलाकारांच्या गाण्यांची व्याप्ती व आवाका अधिक वाढताना दिसतो.

या उपक्रमामुळे हौशी कलाकारांना स्टेज शेअर करण्याची संधी मिळत आहे. आत्मविश्वासाने नवीन गाण्यांची प्रॅक्टिस, विविध शहरांतील कलाकारांशी संवाद करायला मिळत असून नवोदितांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

प्रेक्षकवर्ग वाढण्याचा फायदा या हौशी गायकांना होत असून अनेक छोट्या छोट्या कार्यक्रमात गीत गायन अशा अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. काही जिद्दी कलावंतांच्या पुढाकारातून सुरू झालेला छोटासा गायन उपक्रम आता शेकडो हौशी गायकांना उज्वल भविष्याची संधी देणारा ‘अविष्कार’ ठरत आहे.





## ८० हजारांचा कॉपर वायर लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

नांदुर्गा शिवारातील मे रिन्यु ग्रीन एनर्जी एम.एच.एस.-०३ प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतून अज्ञात व्यक्तीने सुमारे ८० हजार रुपये किमतीचा कॉपर वायर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि.२ डिसेंबर रोजी रात्री १ ते पहाटे ६ वाजेदरम्यान ही घटना घडली. चोरट्याने ४ऋ केबल १६० मीटर, ईयहिंग केबल २५ मीटर असे साहित्य लंपास केले.

या प्रकरणी सिक्युरिटी सुपरवायझर विशाल आशोक तनमोर (वय ३३, रा. धुत्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.६ डिसेंबर रोजी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालयांमध्ये १३ डिसेंबरला होणार लोक अदालत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर लोकन्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपले प्रकरणे तडजोडीसाठी ठेवावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व.स्तर डब्ल्यू. ए. सय्यद यांनी केले आहे.

या पूर्वी दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या लोकन्यायालयामध्ये संपूर्ण बीड जिल्हयातून प्रलंबित व दाखलपूर्व असे एकूण ४७,५५८ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी १३०१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये जवळपास १५ कोटी ६८ लाख ६६ हजार ६०५ रूपयांच्या प्रकरणामध्ये तडजोड झाली. सदरचे लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जिल्हा वकील संघ व सर्व तालुका वकील संघ, पदाधिकारी, विधिज्ञ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.त्याप्रमाणे येणा-या १३ डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोकन्यायालयाबाबत बोलताना न्यायाधीश डब्ल्यू. ए. सय्यद म्हणाले की, लोक अदालतच्या निवाडयाविरूध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो, लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकुमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणा-या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते. आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होउन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत असे आवाहन न्यायाधीश सय्यद यांनी केले आहे.

# पी.एम. किसान योजना : लाभ संशयीत कुटूंबाची व अल्पवयीन लाभार्थीची पडताळणी करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

राज्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६०००/- रुपयांची अर्थिक मदत दिली जाते. योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत २१ हप्त्यांद्वारे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना रक्कमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे,

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य केंद्रशासीत प्रदेशातील जमीनीच्या नोंदीप्रमाणे लागवडीयोग्य जमीनधारक एका शेतकरी कुटुंबातील (पती, पत्नी आणि अल्पवयीन मुले) फक्त एक सदस्य योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहे.पुर्वीच्या जमीन धारकांच्या मृत्यूनंतर वारसाहक्कामुळे दि.०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन हस्तांतरीत झाली आहे. असे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. तसेच इतर कारणांनी (वाटणीपत्र, खरेदी, बक्षीसपत्र, इ.) दि ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, पी एम किसान योजनेमध्ये लाभार्थी समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या पात्रतेचे सत्यापन करून कोणताही अपात्र लाभार्थी योजनेमध्ये समाविष्ट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

यासाठी केंद्र शासनाने पी एम किसान योजनेच्या लाभार्थीची डेटा पडताळणी केली असता या प्रक्रीयेअंती काही विसंगती समोर आलेल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये असे आढळून आले आहे की, एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्याना लाभ मिळत आहे. याशिवाय ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या काही लाभार्थ्यांनी चुकीची माहीती दिलेली आहे. या चुकीच्या बाबींचे निराकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडून अशा लाभार्थ्यांचे प्रामुख्याने खालील चार प्रकारांमध्ये लाभ तात्पुरते रोखण्यात आले आहेत. १. एकाच कुटूंबातील एकाहून अधिक सदस्य लाभ घेत असल्याचे संशयित प्रकरणे (पती पत्नी किंवा अल्पवयीन अपत्ये) २. जुना व सध्याचा जमीनधारक दोघेही लाभार्थी असलेली प्रकरणे (दि.०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) ३. जुन्या जमीनधारकांचे चुकीचे किंवा अमान्य तपशील असलेली संशयित प्रकरणे (दि. ०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) ४. जमीन हस्तांतरणाचे चुकीचे कारण नमूद केलेली संशयित प्रकरणे (दि. ०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) वरीलप्रमाणे संशयित प्रकरणांच्या वर्गवारी नुसार पाटोदा तालुक्यातील संशयित (Suspected) लाभार्थींची एकूण संख्या ४३ इतकी असून या सर्व संशयित प्रकरणांची सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मार्फत भौतीक तपासणी करून व योजनेच्या निकषांनुसार पात्रता तपासण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे (पती-पत्नीचे आधारकार्ड, जमीन नोंदीचा फेरफार, सातबारा उतारा (६ महिन्याचे आतील), रेशनकार्ड तसेच वारसनोंदी साठी मयत व्यक्तीचा फेरफार व मृत्यू प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे तपासणीसाठी तालुका कृषि अधिकारी, पाटोदा कार्यालयात सादर करावी किंवा गावचे सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडे देण्यात यावी. सहाय्यक कृषि अधिकारी हे सदरील शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून शेतकरी योजनेस पात्र/अपात्र असलेबाबत पडताळणी करून पुढील कार्यवाहीसाठी सादर करतील. व तालुक्याचा एकत्रित अहवाल जिल्हा कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल. सदरील संशयित प्रकरणाच्या यादया संबंधित गावचे सहाय्यक कृषी अधिकारी यांचे मार्फत ग्रामपंचायत कार्यालयाचे बोर्डवर लावण्यात येणार आहेत.

# शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा शासनाने विचार करावा

## आ.संदिप क्षीरसागरांची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झालेले आहेत. आ.संदिप क्षीरसागर यांनी सदरील आंदोलनाची दखल घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी राज्य शासनाकडे केली आहे.



मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ढएढ विषयक अनिवार्यतेच्या निर्णयास अनुसरून पुर्नविचार याचिका दाखल करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमीत वेतन श्रेणी लागू करावी, शिक्षकांनाही १०, २०, ३० वर्षांनंतरची सुधारीत तीन वेतन लाभाची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, १५ मार्च २०२४ चा संचमान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा, राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बंद असलेली पदभरती तात्काळ सुरू करावी, विषय पदविधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मध्ये भेदभाव न करता मंजुरी द्यावी इ. मागण्यांसाठी महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाड्यांनी आंदोलन केले आहे. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी शनिवारी (दि.०५) रोजी शाळाही बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे गेल्या अनेक दिवसांपासुन विविध माध्यमातुन आंदोलन करत आहेत. शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक घटक आहे. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागण्यांचा संवेदनशीलपणे आणि सकारात्मकपणे विचार करावा असे आ.संदिप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. या संदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री तसेच शालेय शिक्षणमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे महापरिनिर्वाण दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

हा दिवस दरवर्षी ६डिसेंबर रोजी पाळला जातो.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या देशासाठी ,संविधानासाठी आणि शोषित समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या अमूल्य कार्याचे स्मरण आणि त्यांना आदरांजली वाहने हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे . शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा असा महान संदेश त्यांनी दिला .ते भारतीय राज्यघटनेचे जनक आहेत .अतिशय प्रतिकूल वातावरणात देखील शिक्षणाची कास धरून ३२ पदव्या आणि ९ भाषांवर प्रभुत्व मिळवले .विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण ,वेळेचे नियोजन ,सातत्य अशा विविध गुणांचा अंगीकार करावा .डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणातून समाजाला दिलेली शिकवण आणि विचार लक्षात घेऊन विद्यार्थांनी अभ्यासातून आपल्या जीवनातील ध्येय प्राप्त करावीत .



# सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल अंबाजोगाई पिपल्स बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या संदर्भात ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनच्या वतीने ही माहिती बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांना देण्यात आली आहे. रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण पुणे येथे आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

येथील अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले. यासाठी शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५' ने ही गौरविण्यात आले आहे हे विशेष होय. तसेच आता जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सहकार सभागृह, कॉसमॉस सहकारी बँक लि.मुख्य प्रशासकीय कार्यालय, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जागतिक सहकार वर्षाचे औचित्य साधून सहकार क्षेत्रातील विविध घटकांनी एकत्र येऊन अनुभवविनिमय, विचारमंथन व आगामी दिशानिर्देशासाठी धोरणात्मक चर्चासत्रे आयोजित करण्याच्या उद्देशाने ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन-२०२५' ही सहकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सहकारी गृह रचना संस्था, सहकारी दूध उत्पादक संघ व सहकारी साखर कारखाने अशा विविध सहकार क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई पिपल्स बँकेने कर्ज वितरणाद्वारे छोट्या उद्योगांना, सूक्ष्म व मध्यम उद्योजकांना, सहकारी संस्था तसेच विविध उद्यमशील व्यक्तींना भांडवल उपलब्ध करून देत त्यांच्या व्यवसाय व उत्पन्न वृद्धीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. कर्ज पोर्टफोलिओचे सुयोग्य नियोजन, व्यवस्थापनातील सक्षम धोरण, आर्थिक पारदर्शकता, वेळोवेळी सभासदांना लाभांश वितरण, तसेच रिझर्व्ह बँकेच्या सर्व वैधानिक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून अंबाजोगाई पिपल्स बँकेने सुदृढ, विश्वासार्ह व स्थिर आर्थिक संस्थेचे आदर्श मॉडेल निर्माण केले आहे. या आदर्श कार्यपद्धती, सभासद हित संवर्धन आणि सुयोजित आर्थिक व्यवस्थापनाचा अभ्यास करून आपल्या अंबाजोगाई पिपल्स बँकेची 'ग्रीन वर्ल्ड को प्राईड-२०२५' या प्रतिष्ठेच्या सन्मानासाठी निवड करण्यात आलेली आहे. याबद्दल आपल्या संस्थेस हार्दिक अभिनंदन. असे गौतम कोतवाल (अध्यक्ष, ग्रीन वर्ल्ड, पुणे) यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेस कळविले आहे. या संदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अंबाजोगाई पिपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पिपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली आहे. यंदा ३० सप्टेंबर २०२५ अखेर बँकेने ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या प्रगतीचा आलेख आजतागायत उंचावलेला असून यावर्षी २४ मे २०२५ रोजी बँकेच्या स्थापनेस २९ वर्षे पूर्ण झाली आहेत. दिवसेंदिवस बँकेचे कामकाज वाढत आहे, त्यामुळे सभासद, ठेविदारांचा बँकेवरचा विश्वास वाढत आहे. आहेत. सामाजिक बांधिलकीतून पिपल्स बँक आज बँकींग क्षेत्रात कार्यरत आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात बँकेच्या मुख्य कार्यालय व दोन विस्तारीत शाखांसह एकूण १८ शाखा कार्यरत आहेत. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या आणखी ३ नवीन शाखा सुरू झाल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्र हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे. बँकेच्या सर्व शाखा या संगणकीकृत आहेत. यूपीआय ही सुविधा देणारी अंबाजोगाई पिपल्स बँक ही शहरातील पहिली बँक ठरली आहे. आज बँकेचे स्वतःचे अत्याधुनिक डाटा सेंटर आहे. तत्पर, विनम्र आणि दर्जेदार बँकींग सेवा ही बँकेची ओळख आहे. ३० जुन २०२५ अखेर बँकेची सभासद संख्या - १२९३८ एवढी आहे. बँकेकडे ६१२ कोटी एवढ्या ठेवी, भागभांडवल - २० कोटी, तर स्वनिधी- ५० कोटी एवढा आहे. बँकेने तब्बल ३३४ कोटी रूपयांचे कर्ज वाटप केले आहे. ३३७ कोटी रूपयांची गुंतवणूक ही केली आहे. बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर ४ कोटी ७२ लाख रूपयांचा नफा झाला आहे. बँकेने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर विविध सामाजिक, विधायक आणि लोकोपयोगी उपक्रम राबविले होते हे उल्लेखनीय आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने गरूडझेप घेत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला. यासाठी बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, मुख्यकार्यकारी अधिकारी, वरीष्ठ अधिकारी, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी, पिग्मी एजंट यांनी केलेल्या उत्तम टीम वर्कचेच हे फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध करून देत आर्थिक वर्षात आपला एनपीए शुन्य टक्के ठेवण्याचा, कमीत-कमी राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे, यासाठीच काटेकोरपणे काम करीत बँकेकडून एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले जाते. अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने ही आपला एनपीए हा कमीत-कमी राखण्याचा, ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न प्रत्येक आर्थिक वर्षांत केलेला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने नुकतेच अंबाजोगाई पिपल्स बँकेला एनपीएचे सर्वोत्तम व्यवस्थापन करणारी शहरी सहकारी बँक या गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार' देवून गौरविण्यात आले ही गौरवपूर्ण बाब आहे. पुढे बोलताना बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने सुरूवातीपासून एनपीए कमीत-कमी राखला आहे. सर्वच शाखांतून बँकेमार्फत ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एईपीएस, तसेच युपीआय सारख्या अद्ययावत सुविधा देखील पुरविण्यात येत आहेत. बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी,



सर्व संचालक श्री.वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, अरूण काळे, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, श्रीमती वनमाला रेड्डी, संकेत मोदी, सौ.स्नेहा हिवरेकर, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद व पिग्मी एजंट यांचे सातत्यपूर्ण सहकार्य व योगदान आहे. अशी माहिती चेअरमन मोदी यांनी दिली. अंबाजोगाई पिपल्स बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल सर्वस्तरांतून बँकेचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

**अंबाजोगाई पिपल्स बँकेवर ग्राहकांचा विश्वास :**

अंबाजोगाई पिपल्स बँकेने आपल्या ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच बँक सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करीत वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक यांच्या बँकींग गरजा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. अंबाजोगाई पिपल्स ही ग्राहकांची आपली हक्काची व त्यांचे हित जपणारी ही बँक असून बँकेने ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला तसेच एनपीएचे व्यवस्थापन ही सर्वोत्तम केले याचा आपणा सर्वांनाच आंनद आहे. सर्वांनी बँकेच्या अभिनव सेवांचा आणि सुविधांचा पूर्णपणे उपयोग करावा असे आवाहन करून यापुढील काळात ही अंबाजोगाई पिपल्स बँक सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतक या सर्वांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही देतो.

- राजकिशोर मोदी
(चेअरमन, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक)

# नाशिक कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करू नका, टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामांची सक्ती करण्यात येवू नये

## समाजवादी पार्टीच्या मुख्यमंत्र्यांकडे मागण्या

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

नाशिक जिल्ह्यातील कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करू नका तसेच टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामे सक्ती करण्यात येवू नयेत अशा मागण्या समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना उपजिल्हाधिकार्यांमार्फत गुरूवार, दि.०४ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

समाजवादी पार्टीच्या वतीने देण्यात आलेल्या २ वेगवेगळ्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक जिल्ह्यातील कुंभमेळ्यासाठी साधु व संतांना थाबण्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे व सदर वृक्षतोड करण्यात येवू नये म्हणून सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांनी सुरू केलेले आंदोलन योग्य असुन सदर वृक्षतोड करण्यात येवू नये, सदर वृक्षतोड झाल्यास त्या भागात ऑक्सिजनची कमतरता निर्माण होवून मानव जातीस ते अपायकारक असणार आहे. महाराष्ट्र सरकारचे पर्यावरण विभागाने याची दखल घेण्यात यावी. तसेच संपुर्ण महाराष्ट्रातून या मागणीस पाठींबा मिळत आहे. तरी समाजवादी पार्टी सदर मागणीस जाहीर पाठींबा देत असून सदर वृक्षतोड करण्याचा निर्णय चुकीचा आहे. तो रद्द करण्यात यावा तसेच महाराष्ट्रामध्ये सरकारकडून शैक्षणिक धोरण राबवित असताना



जे शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. ज्यांची नौकरीची फक्त चार-पाच वर्षेच राहीले आहेत. त्यांना टीईटी परीक्षेमधून वगळण्यात यावे व टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामे, जुनी पेन्शन योजना, शिक्षकेत्तर कर्मचारी बंद असलेली पदे भरती, कमी पटाच्या शाळा बंद करण्याचे शासनाचे धोरण अन्यायकारक असून यामुळे जिल्हा परीषदेच्या अनेक शाळा बंद पडत आहेत. तरी शासनाने अशा जाचक अटी लादू नयेत अशा मागण्या समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात आल्या आहेत. जर या मागण्या मान्य झाल्या नाहीत. तर समाजवादी पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजीराव कांबळे, शेख जिलानी महेबुब, शेख जिलानी यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# राजकीय कुस्तीच्या आखाड्यात पंकजाताई महाराष्ट्र केसरी तर देवाभाऊ हिंद केसरी आहेत-शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्राच्या राजकीय कुस्ती आखाड्यात ना.पंकजाताई मुंडे या महाराष्ट्र केसरी आहेत तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंद केसरी आहेत ते केव्हा कोणता डाव टाकतील हे विरोधकांना कळत नाही असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले आहेत



दत्त जयंती निमित्त शिरुर घाट येथे कुस्त्यांचा भाजपच्या वतीने मोठा आखाडा प्रतिवर्षी येथील कार्यकर्त्यांनी व पदाधिकारी यांनी आयोजित करतात या प्रसंगी बोलताना श्री देशमुख म्हणाले की तरुणांनी आज व्यायाम करणे शरीर सुदृढ ठेवणे गरजेचे आहे लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांनी खेळाडूंना वेळोवेळी मदत केली आहे महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांना मुंडे साहेबांनी दत्तक घेतले होते आज महाराष्ट्राच्या राजकारणाच्या आखाड्यात ना.पंकजाताई मुंडे महाराष्ट्र केसरी आहेत तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे हिंद केसरी आहेत यांनी विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणत्या वेळी कोणता डाव टाकतील हे विरोधकांना देखील कळत नाही या ठिकाणी भाजपचे वतीने कुस्तीची दंगल भरवली जाते हे खुप अभिमानास्पद बाब असल्याचे सांगुन या गावाला ना.पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातुन तालीम मिळवून देऊ असे आश्वासन श्री देशमुख यांनी दिले याप्रसंगी जि.प .समाजकल्याण सभापती संतोष हंगे केज मंडळ अध्यक्ष भगवान केदार बीड मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ उपस्थित होते.मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विविध ठिकाणचे पैलवान कुस्ती दंगल साठी उपस्थित होते.या ठिकाणी सुंदर हजारे मच्छीद्र सांगळे अशोक गायकवाड विजय सांगळे बळीराम डोईफोडे विक्रम कुरुंद अजय जाधव महादेव तांबडे रामभाऊ कुरुंद मगरध्वज कुरुंद आश्रुबा घोडके विद्याधर जवळकर शिवाजी सांबरे रामभाऊ जाधव आदी कार्यकर्ते पदाधिकारी

# रामतिर्थ ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांचा 'स्फोट!

## पोलीस, उत्पादन शुल्क विभागावर संगनमताचे आरोप

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ७ डिसेंबर-**

नायगांव तालुक्यातील नरसीपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या रामतिर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे अक्षरशः बोकाळले असून, याकडे पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने खुले आमपणे डोळेझाक करीत असल्याचे चित्र स्थानिक नागरिकांच्या अनुभवातून समोर येत आहे.

ठाण्याच्या हद्दीत अनेक ढाबे व हॉटेल्समध्ये विना परवाना दारू व शिंदी विक्री बेधडक सुरू असल्याचे नागरिकांनी सांगितले. दुसरीकडे नरसीच्या पश्चिम दिशेला असलेल्या गायरान जमिनीच्या जवळील क्रेशर परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि विनापरवाना ब्लास्टिंग सुरू असून, या स्फोटां मुळे परिसरातील गरीब कुटुंबांच्या घरांना तडे जाऊ लागले आहेत.ग्रामस्थांनी दिलेल्या माहिती नुसार, या गंभीर परिणामांनंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस उपाय योजना हाती घेतलेली नाही.

स्थानिकांच्या मते, गेल्या काही वर्षांपासून रामतिर्थ पोलीस ठाणे हे अवैध व्यवसायांचे 'माहेरघर' बनल्या प्रमाणेच परिस्थिती निर्माण झाली आहे. अवैध दारूविक्री, खनिज उत्खनन, ब्लास्टिंग यांसारखे धंदे थांबवण्या ऐवजी, काही पोलीस कर्मचारी कथित हप्ते वसुलीत रमल्यामुळे संपूर्ण कायदा व सुव्यवस्था ढासळली असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.त्यांच्या म्हणण्यानुसार, हप्तेवसुलीमुळेच अवैध धंद्यांना मोकळे रान मिळत असून, उत्पादन शुल्क विभागाचे नियंत्रणही फक्त कागदोपत्रीपुरतेच मर्यादित राहिले आहे.

अलीकडेच याच ठाण्याच्या हद्दीत झालेल्या लाच लूचपत विभागाने घातलेल्या धाडीत नाहकपणे पोलीस कर्मचाऱ्यावर रामतिर्थ ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून.पोलीस कर्मचाऱ्यात सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र अशी गंभीर घटना घडूनही, संबंधित खात्यांनी केवळ काही कर्मचाऱ्यांची नियंत्रण कक्षात बदली करून वेळ मारून नेली, अशीही चर्चा आहे.मूलभूत समस्या तशाच राहिल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी नाराजी पसरलेली दिसून येते. स्थानिकांचा स्पष्ट सवाल आहे अवैध धंदे मोकाट, स्फोटांचे हादरे कायम आणि पोलीस हप्ते वसूल करण्यात मग्न असतील, तर आमच्या सुरक्षेची हमी कोण देणार?या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून रामतिर्थ हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर अंकुश आणावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# शॉर्ट सर्किटच्या आगीत घर जळून खाक;लाखोंचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ७ डिसेंबर-**

सगरोळी येथे कौलारू घराला विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीच्या भडक्यात रहात्या घरासह कपाटातील दाग दागिने, नगदी रोकड व संसार उपयोगी साहित्याची राख रांगोळी झाल्याची घटना आज शनिवार रोजी दुपारच्या सुमारास घडली आसुन यात जवळपास विस ते पंचविस लाख रुपयाचे नुकसान झाल्या चा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सगरोळी येथे शनिवार रोजी गावातील मध्यभागी वस्तीत असलेल्या कौलारू घराला विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत येथील शेतकरी कुटुंबातील हनुमंत दिगंबर सिद्धापुरे, बळवंत बाबाराव सिद्धापुरे, मारोती बापूराव सिद्धापूरे, रेणुकाबाई बालाजी सिद्धापुरे, यांच्या रहात्या कौलारु घरास आज दि.६ डिसेंबर शनिवार रोजी दुपारी बाराच्या सुमारास लागलेल्या आगीत हनुमंत सिद्धापुरे या शेतकऱ्यांच्या घरातील कपाटामध्ये नुकतच सोयाबीन विक्री करून ठेवलेली आडीच लाख नगदी रोकड व मौल्यवान दाग दागिन्यासह संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याचे समजले. तर शेजारील अन्य शेतकऱ्यांच्या घरातील संसार उपयोगी साहित्य व अन्नधान्य व कौलारू घर यात जळून खाक झाले.

आग आटोक्यात आणण्यासाठी गावकऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न केले, पण ही आग आटोक्यात येत नसल्याने तात्काळ बिलोली येथिल अग्निशामक वहानास फोनवर संपर्क साधून बोलावल्यामुळे दोन तासा नंतर ती आग आटोक्यात आली. या आगीत सदरील शेतकरी कुटुंबाच्या घरासह मोठ्या प्रमाणात साहित्याचे व अन्नधान्याचे मोठे नुकसान झाले. असून यात जवळपास विस ते पंचविस लाख रुपयाचे नुकसानीचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीमुळे उघड्यावर पडलेल्या शेतकरी कुटुंबांना शासनाकडून तात्काळ अर्थिक मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांसह शेतकरी वर्गातून होत आहे. तर ही आग आटोक्यात येण्यासाठी येथील बिट जमादार आंबेराय सी. व्हि, पोलीस कर्मचारी शेख शबीर, राजू पाटील शिंपाळकर, शंकर महाजन, प्रभू मुत्येपोड, वैभव भोसले, शेख मुर्तुज, भगवान पा. सिध्दापुरे, सुनिल खिरप्पवार अरविंद बुच्छलवार, सतीश बुच्छलवार, आदिनाथ बाबणे, कोंडापल्ली शंकर, विकास दमय्यावार, सचिन कल्लोड, सचिन बुच्छलवार, विठ्ठल चुन्नमवार, संजय चून्त्रमवार यांच्यासह शेकडो गावकऱ्यांनी सहकार्य केल्याने ही लोकवस्ती दाट आसल्याने पुढील मोठा अनर्थ टळला.

## शैक्षणिक क्रांती हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली : रामभाऊ जाधव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

शिक्षण हे सर्वात शक्तीशाली शस्त्र असून त्याचा अचूक वापर करून शैक्षणिक क्रांती केल्यास प्रत्येकाच्या जीवनाचे सोने झाल्याशिवाय राहत नाही, आंबेडकरी विचार हा परीसस्पर्श असून त्याचे जीवनात अनुकरण केल्यास जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध होते, असे विचार कन्या ताडकळस केंद्राचे केंद्रप्रमुख रामभाऊ जाधव यांनी व्यक्त केले. ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महातपूरी येथे आयोजित महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

शालेय विद्यार्थ्यांसमोर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा जागर घालून विद्यार्थ्यांना जागृत केले. यावेळी शितल सोनकांबळे, संघरत्न सोनकांबळे यांनी बाबांसाहेबाप्रती आपल्या भाषणातून कृतज्ञता व्यक्त केली. सलोनी कस्तुरे या विद्यार्थीनीने शेरोशायरीतून अभिवादन करून सर्वांचे लक्ष वेधले. संजीवनी सोनकांबळे, आर्यन एडके यांनी आंबेडकरी गीते सादर करून अभिवादन केले.

# धोकादायकक्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी शिष्यवृत्ती योजना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्यामार्फत जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात साफसफाई व आरोग्यास धोकादायकक्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी भारत सरकार मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेचा संबंधित पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी केले आहे.

हाताने मेहतर काम करणाऱ्या/ मानवी विष्ठाचे व्यक्तीचे वहन करणाऱ्या व्यक्ती. बंदिस्त व उघड्या गटाराची साफसफाई करणाऱ्या व्यक्ती. मेलेल्या जनावरांची कातडी कमावणारे आणि कातडी सोलणारे. कचरा गोळा करणारे, उचलणारे. मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स ॲक्ट २०१३ मधील सेक्शन २(१)(व) नुसार धोकादायक सफाई व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनिवासी, स्थानिक विद्यार्थ्यांसाठी वार्षिक रुपये ३ हजार ५०० तसेच इयत्ता ३ री ते १० वीमध्ये शिकणाऱ्या निवासी (शिक्षणासाठी बाहेरगावी राहात असलेले) विद्यार्थ्यांना वार्षिक रुपये ८ हजार रुपये शिष्यवृत्ती रक्कम अदा करण्यात येते.

या योजनेसाठी पालक हे उपरोक्त नमूद अस्वच्छ, साफसफाई क्षेत्रात व्यवसाय करीत असल्याबाबत पुढील प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत क्षेत्र:- ग्रामसेवक व सरपंच. नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्र:- मुख्याधिकारी. महानगरपालिका क्षेत्र:- आयुक्त / उपायुक्त. सदरील प्रमाणपत्राचा विहित नमुना सर्व नगरपालिका व गटशिक्षणाधिकारी,गट साधन केंद्र यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**अर्ज करण्याची पद्धत**

सदरील योजनेसाठी अर्ज करण्याकरिता विद्यार्थी ज्या शाळेत शिकत आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी महाडीबीटी पोर्टल प्रणालीच्या . ाशिरीीळल.ारहरळीं.ास या संकेतस्थळावर ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरावयाचे आहे. सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुख्याध्यापक यांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र व पालकाचे हमीपत्र पोर्टलवर अपलोड करावयाचे आहे. सदर योजना स्वयं अर्थसहाय्यित शाळेसाठी लागू नाही. तसेच विद्यार्थ्याला फक्त एकाच मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येईल.

सदरील योजना सर्व जाती धर्माच्या व्यक्तींसाठी लागू आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही उत्पन्नाची अट नाही. विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती किमान ७५ टक्के असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्ती च्या लाभची रक्कम पालकांच्या आधार संलग्नीत बँक खात्यावर दोन हप्त्यामध्ये जमा करण्यात येते. साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती ही योजना राबविण्यात येते, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी दिली.

## जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदी डॉ. राठोड तर कार्याध्यक्षपदी भिलवंडे

**नरसी** -नांदेड जिल्हा काँग्रेसमध्ये मोठ्या हालचाली होत असून, संघटनात्मक फेरबदलाच्या माध्यमातून जिल्ह्यातील राजकीय पटलावर



नवे शक्तीसमिकरण उभे राहत असल्याचे चित्र आहे. जिल्हा सरचिटणीसपदी डॉ. मधुकरराव राठोड, तर कार्याध्यक्षपदी संभाजी पाटील भिलवंडे या दोन दमदार, प्रभावी आणि तडफदार नेतृत्वाची निवड केली असल्याने कार्यकर्ते, पदाधिकारी , नेते अभिनंदन करून शुभेच्छा देत आहेत. मरवाळी तांडा येथील लोकप्रिय सरपंच डॉ. मधुकरराव राठोड आणि नरसीच्या राजकीय परंपरेतून घडलेले सभांजी हानमंतराव पाटील भिलवंडे यांची जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये असलेली त्यांची मजबूत पकड आणि राजकीय जम लक्षात घेऊनच काँग्रेसने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली असल्याचे समजते. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रवींद्र पाटील चव्हाण, जिल्हाध्यक्ष हणमंतराव बेटमोगरेकर, वरिष्ठ नेते राजेश पावडे, श्रीनिवास पाटील चव्हाण, उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, जब्बार खान यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दोन्ही नेत्यांचे अभिनंदन केले. येत्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची सर्वसमावेशक प्रतिमा अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष संघटन अभियान राबविण्याचा संकल्प नवीन जिल्हा कार्याध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे आणि जिल्हा सरचिटणीस डॉ. मधुकरराव राठोड यांनी व्यक्त केला.

## महामानव डॉ.आंबेडकरांना पणती ज्योत रॅलीने अभिवादन

**नांदेड** -प्रज्ञा करुणा विहार समिती व रमामाता महिला मंडळ देगावचाळ नांदेड येथील नागरिकांनी पणती ज्योत रॅली काढून विश्वरत्न



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महपरिनिरवान दिनानिमित्त रॅली काढून अभिवादन करण्यात आले. सदरील रॅलीस प्रज्ञा करुणा विहार येथून प्रारंभ होऊन ती वजिराबाद, शिवाजी पुतळा मार्गे जाऊन रेल्वेस्टेशन परिसर येथे विसर्जित करण्यात आली. सर्वांनी डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले.या रॅलीत मोठया प्रमाणात महिला, पुरुष व बालके यांचा समावेश होता. रॅलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर रहे!जबतक सूरज चाँद रहेंगा!बाबा तुम्हारा नाम रहेंगा!या घोषणा देण्यात आल्या. वाहनावर डॉ. आंबेडकरांची मोठी प्रतिमा होती. प्रत्येकाच्या हातात पणती ज्योत होती.रॅलीच्या यशस्वीतेसाठी माजी नगरसेवकाचे प्रतिनिधी रमेश गोडबोले, भगवान येवले, सुभाष लोखंडे, इंजि. सुनिल हाटकर सिद्धार्थ ढेपे, निर्मलाबाई पंडित, रेखाबाई हिंगोले, शिल्पा लोखंडे, जोत्स्ना गोडबोले, प्रतिभा गोडबोले यांच्यासाह आदिनी परिश्रम घेतले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## प्रतिक मोटर ड्रायव्हिंग स्कूलतर्फे मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण शिबीर

**नांदेड** -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने समाजातील होतकरू तरुण व तरुणींसाठी एक दिवसीय मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले .या शिबीरा मध्ये १०० च्या वर तरुण तरुणींनी सभाग नोंदविला. या शिबीरात गाडी चालवणे, लायसन्स काढणे, रोडवरील नियम इ. संबंधात तज्ञांकडून मोफत मार्गदर्शन व मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण दिले. या शिबिराचे उदघाटक पो.नि. संतोष जोंधळे . प्रमुख पाहुणे म्हणून बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष व रिपाई (आठवले ) चे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष सुखदेव चिखलीकर हे होते . ह्या वेळी जयपाल चिखलीकर, राजेश चौदंते .अरुण चिखलीकर, नितीन देडे ,रवी चिखलीकर., किरण चित्ते ,शुभम जोंधळे.संतोष दुन्डे ,किरण वाघमारे. अमोल राऊत. आदित्य सोनुले. यश चिखलीकर. लकी चिखलीकर.आदींची उपस्थति होती . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैभव चिखलीकर यांनी प्रयत्न केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ७ डिसेंबर-**

विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त किनवट शहरातील शिवाजी नगर भागात आज (ता.६) सकाळी १० वाजता अभिवादन कार्यक्रम अत्यंत श्रद्धा, भावनिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उभारलेल्या मंचापुढे उभी राहिलेली भीमअनुयायांची गर्दी आणि पुतळ्याजवळ ओसंडून वाहणारा भाविकांचा जनसागर यामुळे परिसर निळ्या विचारांनी निनादून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. आ. भीमराजी केराम, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष अभियंता प्रशांत ठमके, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष साजिद खान, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, माजी उपनगराध्यक्ष वेंकट गोपाळराव नेम्मानिवार, रिपाइं चे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष दादाराव कयापाक, प्राचार्या शुभांगीताई ठमके, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, सेक्युलर मुव्हमेंट चे जिल्हाध्यक्ष ड. मिलिंद सर्पे, पीरिपा चे जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, मंडळ अध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे पाटील, प्राचार्य आनंद भालेराव, दीपक ओंकार, ड. सम्राट सर्पे, निखिल कावळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून महामानवांना अभिवादन केले.

यावेळी महेंद्र नरवाडे व अनिल उमरे यांनी सामुदायिक वंदना घेतली. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी केले. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने परिसरात केलेल्या उत्कृष्ट व्यवस्थेमुळे भाविकांना कोणताही अडथळा आला नाही.



महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवाजी नगरासह संपूर्ण शहरात भीमरूपी भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊन कृतज्ञतेने अभिवादन केले. याच निमित्ताने युवा पँथर संघटनेतर्फे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुणांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान करून समाजसेवेचा संदेश दिला. शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.

कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी आणि निळ्या प्रेरणेने भारलेला दिसत होता.

## विद्यापीठात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ डिसेंबर-**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्रात, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर सर, प्र-कुलगुरू आदरणीय डॉ. अशोक महाजन, तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन प्रमुख उपस्थित होते.

यावेळी देवदत्त जोशी व शुभम स्वामी, अधिसभा सदस्य युवराज पाटील, शिवाजी चांदणे, यांची यांची विशेष उपस्थिती होती. तसेच डॉ. एम. के. पाटील, डॉ. रवि एन. सरोदे, अध्यासन केंद्राच्या संचालिका डॉ. सुनिता पाटील , राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारूती गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, रामदास पेद्देवाड, तसेच कर्मचारी संघटनेचे नेते काळबा हनवते यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठामध्ये कबड्डी स्पर्धेला उत्साहपूर्ण सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत कबड्डी क्रीडा प्रकारातील उपांत्यपूर्व सामन्यांना आज सुरुवात झाली. राज्यातील आघाडीच्या विद्यापीठांच्या पथकांमध्ये चुरसपूर्ण लढती रंगण्याची अपेक्षा आहे.

कबड्डी (मुले) उपांत्यपूर्व पहिला सामना वारणा विद्यापीठ, वारणानगर विरुद्ध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दुसरा सामना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुद्ध मुंबई विद्यापीठ, मुंबई, तिसरा सामना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, चौथा सामना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यात होणार आहे. प्रत्येक सामन्यात खेळाडूंचे कौशल्य, चपळाई आणि रणनीतीची तीव्र चुरस अपेक्षित असून मैदानावर थरारक वातावरण निर्माण होणार आहे.

कबड्डी (मुली) उपांत्यपूर्व पहिला सामना मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुद्ध यजमान स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, दुसरा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विरुद्ध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, तिसरा सामना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध वारणा विद्यापीठ, वारणानगर, चौथा सामना एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई विरुद्ध कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांच्यात होणार आहे. गटपातळीवर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या संघांसाठी ही सामने उपांत्य फेरीत मजल मारण्यासाठी निर्णायक ठरणार आहेत.

# नव्याने रुजू झालेले पो. नि. गणेश कराड यांचा मांडवा गावात दौरा; गावकऱ्यांना मोठा दिलासा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ७ डिसेंबर-**

किनवट पोलिस स्टेशनचे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी मौजे मांडवा येथे भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. मांडवा गावातील अवैध दारूविक्री, परस्परांतील वादविवाद तसेच विविध स्थानिक अडचणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कराड यांनी महिलांना आणि ग्रामस्थांना सुरक्षिततेबाबत विशेष दिलासा देत आवश्यक ती कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा सौ. सागरताई शिंदे-पाटील या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून पी.आय. गणेश कराड उपस्थित होते.

या वेळी मांडवा बिटचे जमादार पुरी साहेब, प्रकाश बोधनकर तसेच पोलिस कर्मचारी उपस्थित होते. मंचावर ग्रामसेवक आरमाळकर, सरपंच सौ. सुनिता आत्राम, रामू धर्वे, राजू मेसावार, बालाजी गिटे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला-पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावकऱ्यांनी पोलिस प्रशासनाशी मुक्त संवाद साधत विविध समस्या मांडल्या. कराड यांनी त्या लक्षपूर्वक ऐकून तातडीने निराकरण करण्याचे आश्वासन दिल्याने गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जुना मोंढ्यातील ऐतिहासिक घडीसाठी तीव्र आंदोलन करणार : वाघदरीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

शहराच्या ऐतिहासिक ओळखीचा अविभाज्य भाग ठरलेल्या जुना मोंढा (टॉवर) येथील बंद घडी पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी केलेली सातत्यपूर्ण मागणी आता वेगाने गती पकडताना दिसत आहे. शहरातील नागरी, सामाजिक व शहरी प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणारे आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे कार्य सातत्याने पार पाडणारे पत्रकार वागदरीकर यांनी मागील काही



महिन्यांपासून या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे.

ऐतिहासिक घडी दीर्घकाळ बंद असल्याने शहराच्या सांस्कृतिक वारशाची ओळख धूसर होत चालली होती. घडीचे नियोजित पुनरुज्जीवन हे केवळ संरक्षक दृष्टीने नव्हे, तर नांदेडच्या परंपरेचा सन्मान राखण्यासाठी अत्यावश्यक असल्याची भावना नागरिकांतही व्यक्त होत आहे.

पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी मनपा आयुक्तांकडे अनेकवेळा लेखी निवेदने सादर करून घडी कार्यान्वित करण्याची मागणी केली. या मागणीला नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी व स्वयंसेवी संस्थांकडूनही व्यापक पाठिंबा मिळू लागला आहे. यावर तात्काळ निर्णय घेऊन ऐतिहासिक घडी पुन्हा सुरू करण्याची प्रक्रियेची मनपा प्रशासनाने गतीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांमध्ये जोर धरत आहे.

दरम्यान, या मागणीवर तातडीने निर्णय न झाल्यास प्रस्तावित उपोषणाला सज्ज असल्याचा इशारा पत्रकार वागदरीकर यांनी प्रशासनाला दिला असून, आम्हीही त्यांच्या उपोषणाला साथ देऊ, असे नागरिकांकडून स्पष्टपणे सांगितले जात आहे.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनपा मालकीच्या गाळेधारकांसाठी व्याजात १०० टक्के सूट जाहीर

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.७, डिसेंबर -
लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या गाळे व बीओटी गाळ्यांचे भाडे मोठ्या प्रमाणात थकीत आहे. थकबाकी कमी करून अधिकाधिक भाडे वसूल करण्यासाठी तसेच थकबाकी असलेल्या गाळेधारकांना भाडे भरण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने लातूर महानगरपालिकेने ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत व्याजामध्ये १०० टक्के सूट जाहीर केली आहे.



मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशान्वये आणि उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या नियोजनात ही योजना राबविली जाणार आहे. महानगरपालिका प्रशासनाने गाळेधारकांना व्याजसुटीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. विविध गाळेधारकांच्या मागणीनुसार व्याजसुटीची व्यवस्था करण्यात आली असून, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी थकबाकी असलेल्या गाळेधारकांना तात्काळ थकबाकी भरण्याचे आणि मनपाशी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे, ज्यामुळे भविष्यात होणारी कटू कारवाई टाळता येईल.



### संक्षिप्त वृत्त...



#### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

उदगीर, दि.७ डिसेंबर -
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एस. जी. कोडचे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्कृत विषयाचे प्रा. प्रसाद जालनापुरकर यांनी विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना आंबेडकरांचे सामाजिक समता, बंधुता आणि संविधान मूल्यांचे महत्व विशद केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, ग्रंथपाल डॉ.एल.बी. पेन्सलवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एस. होकरणे, दिनविशेष समितीचे प्रा.डॉ.एम.एस. खांडेकर तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



#### मंगेशकर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

निलंगा, दि.७ डिसेंबर -
तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी रोहिणी कांबळे (बी.कॉम.प्रथम वर्ष) यांनी आपल्या मनोगतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद जाधव यांनी केले. याप्रसंगी माजी प्रा.अनंत गोदरे, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.सुचिता किडीले, डॉ. सत्यशीला जोंधळे, प्रो.मोहन बंडे, डॉ.भगवान कदम, डॉ. विकास कुलकर्णी, राजेंद्र बेलूरे, रूपेश मोरे, विजयकुम ार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



#### 'बसवेश्वर'मध्ये भारतरत्न डॉ. आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

लातूर, दि.७ डिसेंबर -
महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील जयंती उत्सव समिती आणि कार्यालय यांच्यावतीने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. संजय गवई, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरूळे, प्रा. माधव नयने, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आणि रत्नेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांनी महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत तरच समाजाची उन्नती होईल असे आपल्या मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी तर आभार डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले. यावेळी रंगनाथ लांडगे, विनोद दाभाडे, संभाजी लातूरे, सोपान सुतार, ओमकार बोळशेट्टे, योगेश मस्के, अजय गायकवाड, रंगनाथ लांडगे आणि गुरुप्रसाद बिरादार उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात शेतकऱ्यांचा ऊस लागवड कल

सोलापूर तरुण भारत विशेष...

तभा वृत्तसेवा
शिरूर अनंतपाळ, दि.७, डिसेंबर -
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अनेक गावांमध्ये नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात ऊस लागवड मोठ्या प्रमाणात केली जात असल्याचे दिसून येत आहे. ऊस पीक शाश्वत उत्पन्न देणारे असल्याने शेतकरी याकडे जास्त कल दाखवत आहेत.

यावर्षी तालुक्यासह लातूर जिल्ह्यातही मुबलक पाऊस झाल्यामुळे ऊस लागवड वाढली आहे.

ऊस पीक सोयाबीनसारख्या इतर पिकांच्या तुलनेत कमी मशागत मागते आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. ज्या शेतकऱ्याकडे पाणी उपलब्ध आहे, त्यांनी विविध जातींच्या उसाची लागवड केली आहे. लोकप्रिय जातींमध्ये ८६०३२, दहा हजार एक, पंधरा झिरो १२, आठ हजार पाच यांचा समावेश आहे. तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी चंद्रहास पाटील यांनी यावर्षी पी डी एन १३००७ या नवीन ऊस जातीची लागवड केली आणि इतर शेतकऱ्यांना बेणे पुरवली आहेत.

उस लागवड झाल्यानंतर जागृती साखर कारखान्याचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष नोंद घेत आहेत.



नोंद घेण्याच्या प्रक्रियेत ऊस लागवड क्षेत्र, चतु:सीमा, सऱ्यांची संख्या, दोन सरी मधील अंतर, ऊसाची जात व लागवड तारीख यांचा तपशील व्यवस्थित नोंदवला जातो. यावर्षी मागील वर्षांच्या तुलनेत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ऊस लागवडीचे क्षेत्र आणखी वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक फायदा होण्याची शक्यता आहे.



### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'कॉक्सिट' मध्ये अभिवादन

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.७, डिसेंबर -
येथील कॉक्सिट महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष डॉ.एम. आर. पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. पाटील यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला.

यावेळी प्राचार्य डॉ. विनायक जाधव, उपप्राचार्य डॉ. भोसले, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे, डॉ. मासूमदार,

प्रा. बी. बी. देवडे, प्रा. धोत्रे, प्रा. वाघमारे, अशोक सवई, डॉ. नीलेश मोरे, प्रा. सुदर्शन शिंदे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किल्लारी बंद पडलेला साखर कारखाना सुरु

### आमदार अभिमन्यू पवारांनी नीळकंठेश्वर चरणी नवसपूर्ती केली...

तभा वृत्तसेवा
औसा, दि.७, डिसेंबर -
तालुक्यातील किल्लारी येथील अनेक वर्षे बंद पडलेला साखर कारखाना नव्या उमेदीने, नव्या संकल्पना घेऊन नव्या अपेक्षेने सुरु करण्याचा विडा उचलला. यासाठी सर्व बाबीची जुळवाजुळव केली मात्र सतत कांहीना काही अडचणी एकानंतर अनेक पध्दतीने सुरु होत्या. या अडचणीतून सुटका करुन वेळेत शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप व्हावे. म्हणुन ग्रामदैवत निळकंठेश्वरांना साकडे घातले.

कारखाना वेळेत सुरळीत सुरु झाल्याने आ. अभिमन्यू पवार यांनी शनिवार दि. ६ रोजी पहाटेच्या सुमारास तीन किलोमीटर दंडवत घालत साखरेचे पोते अर्पण करुन नवसपूर्ती केली. निवडणुकीच्या दरम्यानच्या काळात किल्लारी, निलंगा तालुक्यातील लोकांनी उभ्या ऊसा प्रश्न उपस्थित करुन कारखाना सुरु करण्याची मागणी केली. शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्नावर व येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी यावेळी कारखाना सुरु करण्याचे आश्वासन दिले.



अनेक वर्षा पासून कारखाना बंद असल्याने कारखान्याची मशिनरी पुर्णपणे निकामी झाली होती. त्याची नव्या मशिनरी साहित्यातून जुळवणी करीत क्षमतावाढ करण्यात आली. मात्र वारंवार येणारे अडथळ्यामुळे कारखाना वेळेत तर सोडा हंगाम संपल्यानंतरही सुरु होण्याचा मागमुस दिसेना. यामुळे सुरु करण्यासाठी केलेली जुळवाजुळव व खर्च वाया जाण्याची शक्यता दिसून येत होती. आ. अभिमन्यू पवार यांनी श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी नीळकंठेश्वर मंदिर गाठले आणि याचना करीत कारखाना वेळेत सुरू झाल्यास साखरेचे पहिले पोते दंडवत घालत येऊन वाहीन, अशी प्रार्थना केली होती. त्यानंतर जोमाने कामाला सुरुवात केली. कारखाना वेळेत सुरू झाला. त्याचे 'नीळकंठेश्वर' असे नामकरण केले. यामुळे शेतकऱ्यांच्या प्रतिक्षेला पूर्णविराम मिळाला. साखरेचे उत्पादन सुरू झाले असून ३० हजार टनांहून अधिक ऊस गाळप झाले आहे. त्यामुळे शनिवार दि.६ रोजी पहाटेच्या सुमारास आ. पवार यांनी आपला नवस पूर्ण करत कारखाना ते नीळकंठेश्वर मंदिर असा जवळपास तीन किलोमीटरचा साष्टांग दंडवत घालण्यास सुरुवात केली. सकाळी दंडवत पूर्ण केला.

साखरेचे पहिले पोते नीळकंठेश्वर चरणी अर्पण केले. त्यांच्यासमवेत पत्नी शोभा पवार, चिरंजीव ॲड. परीक्षित पवार, संतोष मुक्ता, सुभाष जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

#### गळीत हंगाम निर्विघ्न, यशस्वी होईल...

आ. अभिमन्यू पवार आजचा प्रवास केवळ नवसपूर्तीचा नव्हता, तर शेतकरी बांधवांसाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या कृतज्ञतेचे, श्रद्धेचे आणि जबाबदारीचे प्रतीक ठरला. ग्रामदैवत नीळकंठेश्वरांच्या कृपेने यावर्षीचा संपूर्ण गळीत हंगाम निर्विघ्न आणि यशस्वी पार पडेल, असा विश्वास आ.अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

## संत नामदेव शाळेत मिशन पिंक हेल्थच्या वतीने पाचवा आरोग्यजागृती उपक्रम यशस्वी

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.७, डिसेंबर -
संत नामदेव शाळेत मिशन पिंक हेल्थच्या वतीने पाचवा आरोग्यजागृती उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मुलींमध्ये आरोग्य, स्वच्छतेची जाणीव आणि मानसिक-शारीरिक सुरक्षितता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाला मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. वैशाली दाताळ, सचिव डॉ. राखी सारडा, आणि सदस्या डॉ. अपूर्वा चिपुरे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. त्यांनी विद्यार्थिनींसाठी माहितीपर व जनजागृतीपर सत्रे घेतली.

डॉ. वैशाली दाताळ यांनी रक्तक्षय (ॲनिमिया)ची कारणे, लक्षणे व योग्य आहाराचे महत्त्व समजावले. डॉ. राखी सारडा यांनी मासिक पाळी स्वच्छता आणि सर्व्हिकल कॅन्सर लसीकरणाचे महत्त्व सांगितले. डॉ. अपूर्वा चिपुरे यांनी 'गुड टच-बॅड टच', स्वसंरक्षण व मोबाईल व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्ट केले.



उपक्रमात अरिस्टो फार्माच्या सहकार्याने सुमारे १०० विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. रक्तक्षय आढळलेल्या मुलींना लोहगोळ्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री पारगे यांनी विशेष सहकार्य केले. डॉ. सागीर पठाण आणि डॉ. प्रीती यांची उपस्थिती कार्यक्रमाची शैक्षणिक मूल्यवृद्धी करणारी ठरली.

मिशन पिंक हेल्थने भविष्यात अधिक शाळांमध्ये उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला असून मुलींच्या आरोग्यजागृतीसाठी संस्था सातत्यपूर्ण कार्यरत राहणार आहे. यामुळे समाजातील आरोग्य संवर्धनातील त्यांची उपक्रमशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित होते.

## उदगीर येथे 'कितीवणी' विवेक जागरण करणारे संगीतमय नाटक

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.७, डिसेंबर -
नगरपंचायतचे नगरसेवक सुधीर लखनगावे यांनी आपल्या चिमुकली पालखी लखनगावे हिचा द्वितीय वाढदिवस सामाजिक बांधिलकी जोपासत अनोख्या पद्धतीने साजरा केला. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप करून पालखीचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



ही उपक्रममूलक वाढदिवस साजरीकरणाची मोहिम जि.प. केंद्रिय शाळा शिरूर अनंतपाळ, जि.प.प्रा. मुलींची शाळा, जि.प.प्रा. शाळा भोजराजनगर, जि.प.प्रा. शाळा समानगर तसेच जि.प. प्रा. शाळा नागेवाडी येथे पार पडली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेंद्र देवशटवार, तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे, नगरसेवक ऋषिकेश आवळे, माधव खरटमोल, मुख्याध्यापक परमेश्वर तोंडारे, शिक्षक, शाळा समितीचे सदस्य तसेच लखनगावे परिवार व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे समाजासमोर सद्भावना, शिक्षणवृद्धी आणि सामाजिक जबाबदारीचे उदाहरण नगरसेवक लखनगावे यांनी घालून दिल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

## 'अंकुर'मध्ये प्रकल्प व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.७, डिसेंबर -
अंकुर बाल विकास केंद्राच्या वतीने आयोजित प्रकल्प व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक सचिव व शाळेचे मुख्याध्यापक व्यंकट दापेगावकर, संस्थेच्या अध्यक्षा विजया दापेगावकर, माजी केंद्रप्रमुख देविदास भावले, साहित्यिक व इतिहासकार विवेक सौताडेकर, लातूर गट समन्वयक हरिदास, अंकुर विद्यानिकेतनचे मुख्याध्यापक संभाजी नवघरे, योगेश सिरसाट, अनिल सूर्यवंशी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. तृप्ती अंधारे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पाहून आनंद व्यक्त करताना सांगितले, अंकुर आता छोटं रोपटं राहिलं नाही, तर तो एक विशाल, घनदाट वृक्ष बनला आहे. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केलेले उपक्रम, प्रयोग आणि प्रकल्प अत्यंत प्रशंसनीय आहेत, येणाऱ्या काळात अंकुरची भरारी आणखी व्यापक असेल.



मुख्याध्यापक व्यंकट दापेगावकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघपाल शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन संभाजी नवघरे यांनी मानले.

## साने गुरुजी कथामाला कथाकथन स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
अहमदपूर, दि.७, डिसेंबर -
स्व. दत्तात्रय हेलसकर यांनी १९९४ मध्ये स्थापन केलेल्या अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा हेलस ता. मंठा जि. जालना च्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या दृष्टीने संस्कारक्षम, शैक्षणिक, सामाजिक, विधायक उपक्रम राबविले जातात.

पूज्य साने गुरुजी जयंतीनिमित्त कथामाला हेलस आणि जालना येथील मानस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडास्तरीय विभागीय कथाकथन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे सहावे वर्ष असून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती कल्पनाताई हेलसकर यांनी केले आहे.




या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश मोफत असून स्पर्धा मराठवाड्यातील सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आहे.

स्पर्धा दोन गटात होईल. बालगट : इयत्ता पाचवी ते सातवी व किशोर गट : इयत्ता आठवी ते दहावी.

कथाकथनासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील संस्कारक्षम, बोधप्रद कथेची निवड करणे आवश्यक आहे. कथा बाल गटासाठी पाच ते सात मिनिटांची वेळ व किशोर गटासाठी आठ ते दहा मिनिटांची वेळ राहील. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना जिल्हा व विभाग स्तरावर पारितोषिके ज्ञात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करण्याची अंतिम मुदत दि. २० डिसेंबर २०२५ अशी असून स्पर्धा दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.

- नाव नोंदणीची अंतिम मुदत दि. २० डिसेंबरपर्यज
- सदरील स्पर्धा दि. २४ डिसेंबरपासून सुरू होणार
- सहभागी होण्याचे आवाहन